# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७७**

4358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष चौथे / अंक २ / जानेवारी २००४

## संपादकीय

### आपण कोठे चालली आहोत ?

ीन वर्ष सुरु झालं ! नवीन वर्षाची सुरुवात प्रतिवर्षाप्रमाणे बातम्यांच्या क्षणांनीच झाली. थोड्या बऱ्या, बऱ्याच उदास रणाऱ्या, आपण नेमके कोठे चाललो आहोत, या प्रश्नाचे वादळ घोंघावणाऱ्या !

ग्रंथालयांची जी अनेक कार्ये आम्ही सांगतो, त्यातील एक महत्त्वाचे कार्य राष्ट्रीय सांस्कृतिक संचिताचे जतन करणे व हे संचित पुढील पिढ्यांपर्यंत नेणे, हे होय. देशादेशांत असणारी ग्रंथालये त्यांच्या संस्कृतीचे संचित असे जतन करतात. हे ग्रंथ पाहून, त्यांचा अभ्यास करून आपल्या संशोधनाचे मार्ग आखणारे संशोधक आपला सांस्कृतिक प्रगतीतील वाटा उचलतात.

असे असल्याने ग्रंथालये विद्वानांच्या प्रयोगशाळा मानल्या जातात. प्रयोगशाळेत ज्याप्रमाणे भौतिक साहित्याच्या आधारे प्रयोग करून पाहिले जातात व संशोधनाच्या दिशा शोधल्या जातात. तोच प्रकार ग्रंथालयाला अपेक्षित असतो. एखादा प्रयोग चु ो तेव्हा प्रयोगशाळा तोडून टाकणे हा पर्याय नसतो, तर दुसऱ्या शास्त्रज्ञाने पुढील प्रयोगातून ही चूक निदर्शनास आणावयाची ते. यातूनच विज्ञानाचा इतिहास घडला, प्रगती झाली.

ाद्या लेखकाने ग्रंथांच्या आधारे मांडलेली माहिती चुकीची असेल तर दुसरा ग्रंथ लिहून उत्तर द्यावयाचे असते. यालाच सुसंस्कृतपणा म्हणता येईल. पण वर्षाच्या सुरुवातीलाच भांडारकर प्राच्य विद्या संस्थेबाबत जे घडले, ते विषण्ण करणारे होते. आ ल्या संस्कृतीचे पाऊल पुढे जाण्याऐवजी इतिहासपूर्वकाळात पडण्याचे चिन्ह होते.

अ ो होणार असेल तर ग्रंथालयांत विद्वानांनी जायचे कशाला अन् ग्रंथालयांनी संदर्भसेवा द्यायच्या तरी कशाला? असे होणार असेल तर शाळा-महाविद्यालयात जायचे तरी कशाला आणि शिक्षणाचे टेंभे मिरवायचे तरी कशाला? ज्या देशात 'विद्वान र्वत्र पूज्यते ।' अशी परंपरा आहे. तक्षशिला-नालंदापासून अनेक लहानमोठ्या ग्रंथालयांचे योगदान आहे त्या देशात हे घडाव हा दैवदुर्विलास आहे ! किंबहुना ग्रंथालये आणि प्रयोगशाळा नसत्या तर आज कोणत्या युगात आपण वावरत असतो?

त्यामुळे कोणातरी एकाने संदर्भग्रंथाच्या आधारे काहीतरी विपरित विधाने केली तर ग्रंथालयाची नासधूस करावी? हे कोणत्या तर्कशास्त्रात बसते ?

ी सुरुवातच अशी झाली. वैचारिक विश्वात पुन्हा पुन्हा आपण कुठे चाललो आहोत, या प्रश्नाचे प्रतिध्वनी उमटत आहेत दिवसेंदिवस आपण चुकीच्याच मार्गाने जात आहोत, हे सांगणारं काहीतरी घडलंय.

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष चौथे / अंक २ / जानेवारी २००४

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | भांडारकर प्राच्य विद्या संस्थेच्या निमित्ताने | प्रा. प्रदीप कर्णिक | ३ |
| २) | सिंधुदुर्ग जिल्ह्याची ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक पार्श्वभूमी | राखी प्रभुखानोलकर | ९ |
| ३) | श्री तुकाराम महाराज (संक्षिप्त माहिती) | शं. वा. मठ | १६ |
| ४) | विनोबाजींची 'गीता प्रवचने' | आशा भिडे | २२ |
| ५ ) | 'मत्स्यपालन' - माहितीपूर्ण पुस्तक | शरद जोशी | ३१ |
| ६) | साहित्य जगत - एक हजार वर्षांचं संचित एकत्रित देणारा महद्ग्रंथ 'यांनी घडवलं सहस्रक' | शरद जोशी | ३२ |
| ७) | योगाभ्यास - कशासाठी ? कोणासाठी ? | गोविंद त्रिं. साठे | ३३ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |
| ९) | सेवानिवृत्ती | | ३८ |
| १०) | खरंच सांगतो, ती वाचन-उत्सुक गोड मुलं आहेत ! | प्रा. प्रदीप कर्णिक | ३९ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# भांडारकर प्राच्य विद्या संस्थेच्या निमित्ताने

*भांडारकर प्राच्य विद्या संस्थेवरील हल्ला ही या वर्षाची सुरुवात ! या अनमोल साठ्याचा विनाश करून काय साधले जाईल ? रुपारेलचे ग्रंथपाल व दिशाचे नियमित वाचक प्रा. प्रदीप कर्णिक यांचा या संदर्भातील लेख - संपादक*

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेवर 'संभाजी ब्रिगेड' नावाच्या कुणा एका संस्थेने हल्ला केला आणि बहुमोल अशा ग्रंथांची, हस्तलिखितांची, ऐतिहासिक वस्तू, चित्रे, फर्निचर यांची वासलात लावली. काचा फोडल्या, सर्व ग्रंथसंपदा अस्ताव्यस्त केली. चित्रे पळवली, जुन्या मूर्तीही पळवल्या, असे वृत्तांत वाचले. ज्ञानावर, ग्रंथांवर, ग्रंथालयांवर प्रेम असणाऱ्या आणि बौद्धिकतेवर आयुष्यभर भर देणाऱ्या लेखक, संशोधक, वाचक मंडळींच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. सामान्य माणसांनाही ही घटना हृदय हेलावून टाकणारीच होती यात वाद नाही. घटना घडल्यानंतर राज्यभर तीव्र स्वरूपाचा संताप, चीड, निषेध, धिक्कार व्यक्त केला जातोय. ज्यांचा या संस्थेशी कधीही संबंध आला नाही, त्यांना जर इतका क्लेश होत असेल, तर ज्यांनी ही संस्था उभी राहावी, वाढावी, मोठी व्हावी, यासाठी निरतिशय कष्ट घेतले, त्यांचे हृदय तर अक्षरश: पिळवटून निघाले असणार, नव्हे निघालेच आहे.

हा रानटी हल्ला होण्यापूर्वी याच घटनेचे पडसाद अल्प प्रमाणात, पण अत्यंत निंद्य स्वरूपात उमटले होते. जेम्स लेनच्या पुस्तकाला मदत केल्याबद्दल प्रख्यात इतिहास संशोधक डॉ. श्रीकांत बहुलकर यांच्या तोंडाला काळे फासण्यात आले होते. याचा निषेध म्हणून इतिहास संशोधक मेहेंदळे यांनी आपले लेखन फाडून टाकले. मग सेना नेते श्री. राज ठाकरे यांनी माफी मागितली. पण याने समाधान न झाल्याने संस्थेवर हल्ला करण्यात आला. हे रानटी कृत्य निषेधार्ह तर आहेच, पण समाजाला रानटी समाजव्यवस्थेत ढकलणारे आहे.

घटनेनंतर वृत्तपत्रांत प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली. त्यात संस्थेच्या बाजूनेच बहुतांशी अनेकांनी लिहिले वा प्रतिक्रिया मुलाखतीद्वारे नोंदवली. हे खरे असले तरीही केलेल्या हिंसक कृत्याचे समर्थन करणारेही निघाले हे आश्चर्य तर आहेच, पण ते जास्त चिंतनीय-गंभीर स्वरूपाचे आहे. 'लोकसत्ता' दैनिकाने संस्थेच्या उभारणीस देणग्या गोळा करण्याची केलेली सुरुवात व त्यास मिळत असलेला प्रतिसाद उत्तम तर आहेच, पण त्याहीपेक्षा समाजाला अशा कार्यांची बूज आहे, हे दाखवून देणारी ही मदत आशादायकही आहे.

हिंस्र घटनेनंतर जशा सामान्यांपासून मोठ्यांपर्यंत प्रतिक्रिया व्यक्त झाल्या, त्याचप्रमाणे मोठमोठ्या (विशेषत: मराठा वर्गातील) नेत्यांनी या घटनेबाबत मिठाची गुळणी घेतली, हे ही तितकेच बोलके आहे.

संस्थेच्या बाजूने दिलेल्या प्रतिक्रियांबाबत संशोधक-लेखक, ग्रंथप्रेमीवर्ग आभारीच राहील; परंतु खरा प्रश्न आहे (व तो खुद्द सर्वांना बुचकळ्यात टाकणाराही आहे.) तो, त्या हिडीस घटनेचे समर्थन करणाऱ्या प्रतिक्रियांबाबत. या प्रतिक्रिया केवळ घटनेचे समर्थन करून थांबत नाहीत, तर त्याहीपुढे जाऊन काही कृती करण्याची भाषा करू पाहतात. त्यांच्या या भविष्यातील कृती जास्त गंभीर आहेत.

पाशवी वृत्तीची घटना घडल्यानंतर घटनेचे समर्थन अभयसिंह भोसले यांनी केले. ज्यांच्या शिवाजी महाराजांच्या घराण्याशी थेट संबंध आहे, त्यांचे समर्थन (योग्य नसले तरी) समजून घेता येऊ शकते. त्याचवेळी आणखी एक प्रतिक्रिया अशी होती की, पुण्यातल्या

मंडळींनी जेम्स लेनद्वारा अशा लेखनाची महाराष्ट्रात काय प्रतिक्रिया होते ते अजमावण्यासाठी हे संशोधन (ज्याला समर्थक खोटे व विपर्यस्त लेखन म्हणतात) प्रसिद्ध करून पाहिले, पण त्या समर्थकाचा हा मुद्दा टिकत नाही. कारण जर पुण्याची मंडळी त्यामागे असती तर त्यांनीच हे लेखन समाजाला दाखवले असते. जेम्स लेनच्या पुस्तकात काय आहे हे सर्वप्रथम 'चित्रलेखा'चे संपादक श्री. ज्ञानेश महाराव यांनी दाखवून दिले. पुण्याची मंडळी तोपर्यंत त्या मजकुराबाबत अनभिज्ञच असावीत असे घटनाक्रमांवरून वाटते. जेव्हा त्यातील काहींना हे समजले तेव्हा त्यांनी त्याबाबत तीव्र नापसंती दाखवली. त्याचा निषेधही केला.

दिनांक ९ जानेवारी २००४ रोजी 'लोकसत्ता' दैनिकाने संपादकीय पानावर अनेकांच्या हल्ला प्रकरणीच्या प्रतिक्रिया छापल्या आहेत. त्यातील एक चाळीसगावचे डॉ. प्रकाश पाटील यांची समर्थन करणारी प्रतिक्रिया आहे, तर 'चित्रलेखा'चे संपादक श्री. महाराव यांची इतिहास संशोधक मेहेंदळे यांच्या हस्तलिखित फाडण्याच्या कृतीवर टीका करणारी आहे. 'संशोधकाला असे उफाळून येणे शोभत नाही' असे म्हणून त्यांनी 'उफाळून वा संतापून केलेली कृती' असे गृहीत धरूनच ही टीका केली आहे. मेहेंदळे यांची ती कृती 'संतापून' केलेली नव्हती, तर हताश, निराश व उद्विग्न अवस्थेत केलेली होती. हे हताशपण, ही निराशा व समाजव्यवस्थेत आलेले दुबळेपण यातून केलेली ती निषेधाची एक वेगळी रीत होती. ही अपरिहार्य अवस्था एका संपादकाला समजून घेता येत नसेल, तर झुंडशाहीला समजणे आवाक्याबाहेरचे आहे.

डॉ. प्रकाश पाटील यांची प्रतिक्रिया मात्र अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. त्यांनी नुसते समर्थनच केलेले नाही, तर जेम्स लेन यांचे आक्षेपार्ह वाक्यच उद्धृत केले आहे. आगीत तेल टाकण्यासाठीच हे केले आहे काय, असा संशय यावा इतका त्याचा उघडाबोडका उल्लेख त्यांनी केला आहे. 'लोकसत्ता' दैनिकाने काही एक देणग्या जमवू नयेत' असा सल्लाही त्यांनी संपादकांना दिला आहे. या देणग्या ग्रंथालयाच्या उभारणीसाठी जमा केल्या आहेत हे त्यांच्या लक्षात येणे कठीण आहे. कारण 'तीन पैशाचे फर्निचर' अशी संभावना त्यांनी भांडारकर संस्थेची केली आहे. त्यांच्या दृष्टीने हे साहित्य तीन पैशाचे असले तरी अशा संस्थांना तेच फर्निचर लाखमोलाचे असते व 'समाजात विष पेरणारी ग्रंथसंपदा' त्यांना वाटते, ती संशोधकांच्या दृष्टीने राष्ट्रही ओवाळून टाकावे इतकी महत्त्वपूर्ण असते. हा दृष्टिकोनाचा फरक सोडून देऊ, पण त्यांच्या पत्रातील चार मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

एक, त्यांनी या संशोधन माहितीच्या पुरवठ्याची सीआयडी चौकशी व्हावी, यासाठी अर्ज केला आहे. ही कृती त्यांना व त्यांच्या इतर समर्थकांना याआधीही करता आली असती व तीच योग्य बाब झाली असती. त्यासाठी संस्थेचा बळी देण्याचे कारण नव्हते. संशोधनाबद्दल आक्षेप आणि संस्थेबद्दल आक्षेप या दोन भिन्न गोष्टी आहेत. गुंडशाहीचा इतका विवेकही संपला आहे हेच या हल्ल्यावरून दिसते. याच प्रकारचा त्यांचा मुद्दा आहे, तो उच्च न्यायालयात जाण्याचा. न्यायालयात ते व त्यांचे समर्थक हल्ल्यापूर्वीच गेले असते, तर संस्थेची हानी टळली असती.

त्यांच्या पत्रातील दुसरा मुद्दा आहे तो, या वा यासारख्या संस्थेतील ग्रंथसाहित्याला जमीनदोस्त करण्याचा. हा प्रकार भयानक आहे. कोणत्याही ग्रंथालयात एखादा अभ्यासक येतो व तो जे पुरावे गोळा करतो, त्यावर काहींचा आक्षेप असला तरी, त्यासाठी ग्रंथालय ही संस्था कशी काय दोषी असू शकते ? आज या समर्थकांनी भांडारकर संस्था फोडली, उद्या विद्यापीठीय ग्रंथालये जाळतील. म्हणजे आपली ग्रंथसंपत्ती असल्या दांडगाई करणाऱ्या धटिंगणांच्या हवाली करायची काय? आम्ही रानटी युगात जाण्याचा जो गेले १५-२० वर्षे प्रयत्न करतोय त्याचेच हे उत्तम उदाहरण आहे. असली जाळपोळ,

फाडाफाडी, पळवेगिरी करून आम्ही इतिहास कसा काय बनवणार ? उलटपक्षी पळवलेल्या, फाडलेल्या कृतीवरून आक्षेपार्ह मुद्दा खराच आहे वा असावा याबद्दल संशय वाढीस लागू शकत नाही काय?

तिसरा मुद्दा असा की, त्यांनी लेखनाच्या ओघात 'भांडारकरांनी जाहीर माफी मागावी, तरच हे प्रकरण मिटेल' असे म्हटले आहे. आता भांडारकर कसे काय वरून येऊन माफी मागणार ? ते डॉक्टरसाहेबांनाच माहीत! संस्थेने माफी मागावी असे त्यांना अभिप्रेत असावे, पण त्यांनी लक्षात घ्यावा असा हा छोटा मुद्दा आहे. वर्तमान काळात लिहितानाही ज्यांची गफलत होते तेथे तीनशे वर्षांमागच्या लेखनात झाली असण्याची शक्यता आहे (नव्हे ती झालीच आहे) त्यासाठी वड्याचे तेल वांग्यावर काढण्याची गरज नाही. आता डॉक्टरसाहेबांच्या या चुकीच्या लेखनासाठी ते त्यांचे टेबल, खुर्ची, त्यांनी ज्या पेनाने लिहिले ते पेन, ज्या टपालाने पत्र 'लोकसत्ते' ला पाठवले ते टपाल खाते, ज्या 'लोकसत्ते'ने छापले ते वृत्तपत्र, त्यांची कचेरी जाळणार आहेत काय ? चूक कोणाची शिक्षा कोणाला ! माफी मागावी इतकीच जर अपेक्षा होती, तर हेच पत्र आधी छापायचे ! संस्था, ग्रंथसंग्रह वाचवण्यासाठी माफी मागितली गेली असती, त्यासाठी लाखमोलाची संस्था कशाला वेठीस धरली ? माफी संस्थेच्या वतीने मी एक ग्रंथप्रेमी म्हणून मागतो आहे. कळकळीची विनंती करतोय. कृपया ग्रंथ, ग्रंथालये, साधने, दस्तऐवज यांना हात लावू नका. डॉक्टरसाहेब, या महान संशोधकांनी उपाशी, तापाशी राहून, वणवण भटकून, लोकांच्या दारात तिष्ठत राहून ही लाखमोलाची साधने वर्षेनुवर्षे खपून जमा केली आहेत. त्याला असे कवडीमोल करू नका ! राष्ट्राची ही हानी आहे.

डॉ. पाटील यांच्या पत्रातील चौथा मुद्दा असा की, 'शिवाजींच्या बदनामीचं काहीच वाटत नाही'. डॉक्टरसाहेब आपण फक्त 'शिवाजी' लिहिले आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज' असे नको काय? पण ते जाऊ द्या. शिवाजीमहाराजांच्या विषयी झालेली बदनामी महाराष्ट्रात कोणीच सहन करणार नाही. महाराष्ट्राचे तर ते दैवत आहे. डॉ. पाटील सांगतात व ब्रिगेड ज्या पद्धतीने या बदनामीकडे पाहतात व कृती करतात त्याच पद्धतीने साऱ्या जगाने निषेध करावा, ही त्यांची मागणी अवास्तव तर आहेच, पण असंस्कृतही आहे. झुंडशाहीपेक्षा चर्चा, मसलत, वादविवाद, व्याख्याने, लेख, पुस्तिका, पुस्तके लिहिणे व त्यातून बदनामी वा अमान्य मजकूर सप्रमाण खोडून काढणे हे सुसंस्कृत जगाचे मार्ग आहेत व तेच समाजाच्या प्रगतीला आवश्यक आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात वसाहतवादाच्या दृष्टीने भारताचा इंग्रजांनी लिहिलेला इतिहास रानडे, केळकर प्रभृतींनी सप्रमाण खोडून काढलाच, पण तो इंग्रजांना मान्यही करावा लागला. त्यांना जाळपोळ करावी लागली नाही. स्वभाषा, स्वदेश, स्ववाङ्मय यांची महती इंग्रजांच्या मुळे झाकोळून गेलेली पाहून विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाला' प्रसिद्ध केली. त्यातूनच जनतेत जागृती झाली. जाळपोळ, विध्वंस करून हे झाले असते काय?

इंग्रज देशातून गेले व त्यांनी सोडलेल्या काही प्रथा इथे अत्यंत अभिमानाने मिरवल्या आहेत. इंग्रजांनी वेळोवेळी काही पुस्तकांवर बंदी आणली, ती त्यांच्या राज्याला धोका निर्माण होऊ नये म्हणून. आम्हीही स्वातंत्र्योत्तर काळात अनेक पुस्तकांवर, लेखनावर बंदी, जप्तीसाठी भांडत राहिलो आहोत. कोल्हापूर गॅझेटियर, लीळाचरित्र, नामदेवांवरील दुर्गाबाईंचा लेख, रिडल्स, मनुस्मृती, रामदासस्वामी आणि पेशवाई, पुंडलिकांची सतीकथा, भाऊ पाध्येंचा वासूनाका, राडा, मर्ढेकरांची कविता, दिलीप चित्रे यांची 'केसाळ काळेभोर पिल्लू' ही कथा, पाडगावकरांची 'पुरुष सिंह' कविता, श्रीकांत सिनकर यांची 'म्हातारी', तेंडुलकरांचे घाशीराम, बाईंडर, अर्नाळकरांची 'श्यामा' कादंबरी असे अनेकच दाखले आहेत. इतकेच कशाला 'महानगर' दैनिकावरील हल्ले, 'हिंदू' दैनिकावरील हल्ले, 'अल्फा' या वाहिनीवरील हल्ला,

'तहलका'ला दाखवलेला हिसका असे वृत्तपत्रसृष्टीतील भयानक प्रसंग आहेत. नाटक, सिनेमा यातील यादी केली तर ती अफाटच होईल. नुसते 'माझे पती छत्रपती' चेच उदाहरण बोलके आहे.

या सर्व घटनांचा प्रवास व टप्पे मला फार अस्वस्थ करणारे वाटतात. त्यातून या कृतींचा हा प्रवास एका विशिष्ट टप्प्यावर आज आला आहे. व आजचा हा टप्पा फारच व्यथित करणारा आहे.

पहिला प्रवास हा अश्लीलतेविरुद्ध होता. त्याबाबत कृष्णराव मराठे, आचार्य अत्रे यांनी तोफ डागली. काही प्रकरणे कोर्टात गेली पण ती तिथे टिकली नाहीत. पण यात टोकाच्या भूमिका घेतल्या गेल्या नाहीत. कालांतराने वाद संपुष्टात आले. पुढच्या टप्प्यात व्यक्तींच्या संदर्भातील लेखनाबाबत समूह अधिक उग्र होत गेलेला दिसतो. त्यात सावरकर (सती, फ्रिडम अॅट मिडनाइट), शाहू महाराज (कोल्हापूर गॅझेट) इत्यादी अनेक कलाकृतींवर प्रथम आगपाखड झाली. नंतर लगेच मोर्चे, निषेध, बंदीची मागणी, प्रसंगी लेखकाला घेराव, नाटकांवर बंदी, नाट्यगृहावर क्वचित हल्ला अशा घटना वाढत गेल्या. सरकारने काही पुस्तकांवर बंदीही आणली, ती दबून जाऊन.

नंतरचा रोख हा वृत्तपत्रसृष्टीवर प्रामुख्याने वळवला गेला. मोडतोड, जाळपोळ, दमदाटी, हिंसक व हिंस्र बनून जमावाने आपली दहशत पसरवण्यास सुरुवात केली व त्याचाच आजपर्यंत सर्वत्र जोर होता व आहे. भांडारकर संस्थेवरील हल्ला हा या झुंडशाहीच्या मार्गाचा अगदी अलीकडचा टप्पा आहे. त्यात साधने नामशेष करण्याची कृती आहे. आगपाखड, ते साधने नामशेष करणे इथपर्यंतचा हा प्रवास आज या टप्प्यावर उभा आहे, तो समाजाला गर्तेत बुडवणारा, देशाला डुबवणारा आहे. साधनेच संपली तर संशोधन होणार नाही, हा हेतू व त्यात दहशत मिसळून टाकली तर आपल्याला हवे तेच व हवे आहे तसेच लेखन घडू शकते, याची जाणीव वाढीस लागणार व हेच अत्यंत क्लेशकारक आहे. मागील घटनांपेक्षा ही घटना जास्त गंभीर, धोकादायक आहे ती या अर्थाने.

या सर्व घटनांमागची शक्ती तपासली तर असे दिसून येते की, सर्व समाज या कृतीच्या मागे नाही. काही संबंधित वर्तुळातील समुहगटच त्या त्या वेळी आक्रमक बनतो. नामदेव शिंपी समाज, दलित वर्ग, मराठा समाज, गांधीवादी इत्यादी असे अनेक गट वेळोवेळी वेगवेगळ्या प्रकारांत आक्रमक झाले आहेत. याचवेळी इतरांना त्याचे काहीच देणेघेणे नाही अशा गतीने बाकीचे जग चालत राहते. ग्रंथप्रेमी हळहळतात, पत्रकार त्यावर लिहितात व गप्प बसतात. साहित्यिक, विचारवंतांनी कृती करावी, अशी अपेक्षा व्यक्त होते. निषेध, पत्रकेही निघतात. पण फार काही ठोस कृती होत नाही. ज्यांची शक्ती जास्त त्या बाजूने सरकार झुकते व बंदी येते. घटना मागे पडतात. साहित्य संमेलनात ठराव येतात, यावर वाद झडतात, राजकारण केले जाते. ठराव होतात व त्याला कोणीही किंमत देत नाही. ठराव आले नाहीत तरीही काही बिघडले आहे असे कोणाला फारसे वाटत नाही. एकविसाव्या शतकात जग 'Knowledge' कडे जोरात वाटचाल करत आहे. १८व्या, १९व्या शतकातल्या समाजधुरीणांनी भारताला जे तेज मिळवून दिले होते, ते पुसण्याचे कार्य मात्र आम्ही चोख करत आहोत.

कोणाच्या शब्दाला वजन नाही. कोणाचा नैतिक धाक वाटेल असे व्यक्तिमत्त्व नाही. व्यक्तिपूजा, व्यक्ति स्तोम फाजील प्रमाणात वाढले आहे. दुर्गाबाई असत्या तर त्या कडाडल्या असत्या. आज असे कोण आहे? हीच आजची आपली शोकांतिका आहे.

दुर्गाबाईंनी त्यांच्या एका लेखात 'माय डेज विथ गांधी' या पुस्तकाचा दाखला दिला आहे. या पुस्तकाचे

लेखक डॉ. निर्मलकुमार बोस हे स्वत: गांधींचे अनुयायी होते. त्यांनी गांधीजींच्या ब्रह्मचर्याच्या प्रयोगावर टीका आपल्या पुस्तकात केली. त्यावेळी गांधीजी हयात होते. ते शांत तर राहिलेच, पण त्यांचे प्रयोग त्यानंतरही चालूच राहिले. पण त्यांच्या अनुयायांनी काय केले ? 'गांधीभक्तांनी ते पुस्तक लवकरात लवकर आणि 'कायम' अंतर्धान कसे होईल, याबाबतीत जलद आणि यशस्वी कार्यवाही करून ते 'नाहीसे' केले,' असे दुर्गाबाईंनी लिहिले आहे. ते बोलके आहे. मूळ व्यक्ती व त्यांचे अनुयायी यात कसा जमीन अस्मानाचा फरक असतो, हेच यावरून लक्षात येते.

दुर्गाबाईंनी या दाखल्याचा जो उत्तरार्ध लिहिला आहे तो अधिकच बोलका आहे. डॉ. बोस यांचा हा ग्रंथ आर्थर कोस्लर यांना हवा होता. भारतात धुंडाळून ते थकले पण इथे त्यांना तो मिळाला नाही. लंडनमध्ये हा अदृश्य झालेला ग्रंथ लंडनमध्ये कसा मिळाला याचे वर्णन कोस्लर यांनी त्यांच्या 'लोटस व रोबो' या ग्रंथात केले आहे असे बाईंनी लिहिले आहे. याचा अर्थ आम्ही भारतीयांनी कितीही कोंबडे झाकले तरी ते कुठेतरी दुसरीकडे असतेच. त्याला ही झुंडशाही काय करणार ? पूर्वी कम्युनिस्ट राजवटीत लेखक, शास्त्रज्ञ दुसऱ्या देशात आश्रय घेत असत, तसे आपल्याकडे होईल. ज्यांना आश्रय घेणे शक्य नाही ते आपल्या संशोधन लेखनासाठी आश्रय मागतील. यातून तोटा आपलाच आहे. आपण ज्ञानाच्या बाबतीत दिवसेंदिवस कफल्लक होत जाऊ. एखादा रोगी दगावला तर आम्ही हॉस्पिटलच जाळून टाकतो, विरोधी काही छापले तर वृत्तपत्र कचेरीही जाळतो. आज ग्रंथालयावर घाला पडलाय. उद्या लेखक-संशोधक-पत्रकारांना जिवंत जाळले जाईल. नाही तरी हुंड्याला मारण्याचा, सुनांना जाळण्याचा आणि एकतर्फी प्रेमातून तरुणींना मारून टाकण्याचा अनुभव आम्हाला आहेच आहे, तो कामी येईल. सारा समाज असहिष्णु बनत चाललाय. न्यूनगंड, भयग्रस्तता, ताबेदारी, मक्तेदारी सुटण्याची भीती, तापटपणा, द्वेष, मत्सर, शत्रुत्व, राग या भावनातिरेकाची गेल्या काही वर्षांत कमालीची वाढ झाली आहे. समाज मानसिकदृष्ट्या रोगट बनत चालला आहे. वेळीच उपाय केले नाहीत तर भयानक स्थितीला पुढच्या पिढीला सामोरे जावे लागणार आहे.

दुर्गाबाईंनी दुसऱ्या एका लेखात जे म्हटले आहे, त्याची आठवण होत आहे. त्या म्हणतात, ''मी विचारस्वातंत्र्याची आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्याची पुरस्कर्ती आहे. ती अशासाठी की, वेगवेगळी मते समाजात उमटावीत. बळजबरीने बोलणाऱ्याचे तोंड बंद होत नाही की कुणी लिहायचे थांबत नाही .... प्रत्येकाच्या विचाराला मुक्त अवसर मिळणे हे सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने अपरिहार्य आहे. वठणीवर आणण्याचा उपाय बंदी नव्हे.... उत्तर द्यायचे ते त्या विषयातल्या तज्ज्ञांनी दिले पाहिजे. अनेकांनी ते केले तर पुस्तकाची मर्यादा लोकांना आपोआप कळून येईल.'' असे नमूद करून त्यांनी प्रो. हेरॉल्ड लास्की यांचे याबाबतचे मत नोंदवले आहे. ते असे, '' धर्मसंस्था, सामाजिक संस्था आणि शासन यांनी एखाद्या वर्तणुकीला, विचारसरणीला त्याज्य ठरवले, तरी तिच्यासंबंधीचा विचार समाजात अन्य तऱ्हेने चालूच असतो आणि कालांतराने तो उसळी मारून तर येतोच येतो''.

लास्की यांचे मत पाहता जेम्स लेन यांनी जे लिहिले ते आज बंद केले गेले तरी, पुढे कधीतरी याच पुस्तकाचा आधार घेऊन कोणीतरी लिहिणारच. कारण त्याची विक्री आज थांबली असली तरी यापूर्वी जगभर झालीच आहे. भारतात एकवेळ ही बंदी असेल, पण जगभराचे काय करणार! त्यापेक्षा लेन यांचा विचार आपल्या तज्ज्ञ, जाणकार, व्यासंगी इतिहासकारांनी सप्रमाण खोडून काढायला हवा. आपल्या इतिहासकारांना हे मोठे आव्हान आहे व ते त्यांनी स्वीकारायला हवे. हा वाद सुरू झाल्यापासून एकाही इतिहासतज्ज्ञाने लेन यांच्या विधानाचा समाचार का घेतला नाही? निषेध जरूर केला गेलाय, पण

त्याच्या संशोधनाची चिरफाड करायला हवी, अशी सामान्य जनतेची अपेक्षा असणार व ती रास्त आहे, की आपले इतिहासकार लेन यांचे संशोधन मनातल्या मनात वा खाजगी बैठकीत मान्य करतात ! आम्हा वाचकांना खरे उत्तर हवे आहे. मिळेल?

आपल्या लेखनासाठी, संशोधनासाठी किती संशोधक ताठ भूमिका घेतील याविषयी शंकाच आहे. जर कणखर भूमिका घेणे शक्य नसेल, आपल्या भूमिकेवर ठाम राहणे जमत नसेल तर ती दुर्दैवी गोष्ट आहे. ज्ञानाला मारक आहे. अशी भूमिका फारच थोड्यांना घेणे जमले आहे, हे आपले वास्तव असेल तर झुंडशाही अशीच नव्यानव्या रूपात समोर उभी ठाकणारच आहे.

झुंडशाहीला नेतृत्व देणाऱ्या मंडळींची काही जबाबदारी आहे. जाळपोळ, तोडफोड करण्यापेक्षा मुद्देसूद चोख उत्तर कसे देता येईल याचे भान ठेवायला हवे. त्यासाठी ग्रंथालये तोडणे, साधने खलास करणे हा उपाय नाही. ग्रंथालये कशी उभी राहतात, याबाबत प्रसिद्ध संशोधक प्रा. अ. का. प्रियोळकरांनी लिहून ठेवले आहे.

ते म्हणतात, 'उत्कृष्ट ग्रंथसंग्रहालयाची निर्मिती अखंड अनेक वर्षांच्या प्रयत्नाने हळूहळू होत असते. एखादा नवकोटनारायण जरी आपणास प्रसन्न झाला तरी तुम्ही ग्रंथालयाची प्रचंड इमारत उभारू शकाल, परंतु आतील ग्रंथसंग्रह आपणास गोळा करता येणार नाही. '' असे सांगून त्यांनी जॉन हिलबर्टन यांचे एक प्रसिद्ध वाक्यच उद्धृत केले आहे. ते असे :

"A great Library cannot be constructed - it is the growth of ages. You may buy books any time with money, but you cannot make a library like one that has been a century or two a growing, through you had the whole national debet to do it with".

हिंसक गटांनी हिलबर्टन यांचे विचार लक्षात ठेवायलाच हवेत. ग्रंथालयांच्या उभारणीला जे काळाचे परिमाण आहे ते क्षणार्धात नष्ट करणे सोपे आहे, पण पुनर्बांधणी केवळ अशक्य आहे. तेव्हा पुन्हा एकदा कळकळीची हात जोडून विनवणी करतो - कृपया ग्रंथसंग्रहाचा नायनाट करू नका. त्यात तुमचे, आमचे, सर्वांचेच नुकसान आहे.

प्रा. प्रदीप कर्णिक,
फ्लॉवर व्हॅली, ठाणे.
दूरध्वनी - २५४७६१४५

## जोशी-बेडेकर महाविद्यालयास B++ दर्जा

नॅकच्या प्रतिनिधी मंडळाने जोशी महाविद्यालयास २७ व २८ डिसेंबर रोजी भेट दिली. या भेटीत नॅकच्या पद्धतीनुसार हे प्रतिनिधी मंडळ माजी विद्यार्थी, पालक, शिक्षक या सर्व घटकांना भेटले.

अलिकडेच नॅककडून आलेल्या पत्रानुसार आमच्या महाविद्यालयास B++ दर्जा मिळाला आहे. बांदोडकर विज्ञान महाविद्यालनंतर या महाविद्यालयासही B++ दर्जा मिळाला. ही अत्यंत स्पृहणीय बाब आहे.

प्राचार्य गोखलेसरांच्या नेतृत्वाखाली यासाठी कष्ट करणाऱ्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

- संपादक

# सिंधुदुर्ग जिल्ह्याची ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक पार्श्वभूमी

*सावंतवाडी येथे जाण्याचा योग आला. तेथील श्रीराम वाचन मंदिरात कु. राखी प्रभुखानोलकर यांचा परिचय झाला. त्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठासाठी यावर्षी M.Lib.s. करताना सादर केलेल्या प्रबंधिकेतील हे प्रकरण आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माहितीचे संकलन वाचकांना नक्कीच उपयुक्त ठरेल. - संपादक*

या छोट्याश्या जिल्ह्याला वैभवशाली ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. समृद्ध अशी लोककलांची सांस्कृतिक परंपरा आहे. या जिल्ह्याला अठराव्या शतकापासूनची शैक्षणिक पार्श्वभूमी आढळते. '[1]तरीही भौगोलिकदृष्ट्या एका बाजूला अरबी समुद्र व दुसऱ्या बाजूला सह्य पर्वत अशा चिंचोळ्या भूभागावरील हा जिल्हा आर्थिकदृष्ट्या मात्र संपन्न नाही. अत्यल्प औद्योगिकीकरण, बेभरवशाचा पाऊस व त्यावर आधारित थोडीफार भाताची शेती, केवळ पावसाळी वाहणाऱ्या नद्या, निकृष्ट जमीन यामुळे हा जिल्हा आर्थिकदृष्ट्या मागास म्हणून गणला जातो.



असे असले तरी प्रतिकूल परिस्थितीशी सतत झगडणारा हा सिंधुदुर्ग जिल्हा व त्या जिल्ह्यातील ही महाविद्यालये या प्रतिकूल परिस्थितीवर शक्य तेवढी मात करतात.

## सिंधुदुर्ग जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी -

जिल्हा सिंधुदुर्ग - पूर्वेस सह्याद्रीचे कडे आणि पश्चिमेस अरबी सागर यांच्यात वसलेला हा दक्षिण कोकणचा एक भाग. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने आणि वास्तव्याने पावन झालेली ही भूमी ! पण त्याही पूर्वी प्राचीन काळापासून कोकणात - दक्षिण कोकणात पर्यायाने सिंधुदुर्गाच्या भूमीत अनेक राजघराणी नांदली. त्यापैकी काही राजघराणी आजही अस्तित्वात आहेत.

भूगर्भ शास्त्रज्ञांच्या मते कोकण भूमी हा ज्वालामुखीच्या उत्पातात समुद्राच्या तळापासून वर उडवला गेलेला भूप्रदेश आहे. तर हिंदू पुराण - शास्त्रानुसार लोभी ब्राह्मणांना सारी पृथ्वी दान केल्यानंतर स्वत:स राहायला कुठेही जागा उरलेली नाही, हे पाहून भगवान परशुरामाने समुद्र १०० योजने मागे हटवून निर्माण केलेली भूमी म्हणजे कोकण होय. भगवान परशुरामांची माता 'कुंकणा' हिच्या नावावरून या प्रदेशाला कोकण हे नाव पडले. '[2]थोडक्यात सिंधुदुर्ग - कोकणाचे अस्तित्व थेट पुराणकाळातही होते. इसवी सन पूर्व चौथ्या शतकापासून कोकण हे नावारूपास आले. बृहद्संहिता, राजतरंगिणी वा चालुक्यकालीन शिलालेख यात कोकणचे उल्लेख आढळतात. पेरिप्लस, प्लिनी, टॉलेमी, स्टॅबो, आल्बिरूनी आदी प्राचीन परदेशी ग्रंथकारांनी आपल्या ग्रंथांतून तसेच चिनी प्रवासी युआन स्वांग यानेही कोकणचा उल्लेख केलेला आहे. म्हणजेच

१ फळेकर, डी डब्ल्यू - सावंतवाडी शिक्षण समितीचा अहवाल - जानेवारी सन १९३१

२ कदम, माधव असा हा सिंधुदुर्ग, सुनिक प्रकाशन सिंधुनगरी, फेब्रुवारी २००० पृ.क्र.२

प्राचीन काळापासून सिंधुदुर्गासह कोकण प्रदेश हा ग्रीस, चीन, इजिप्त आदी देशांना माहीत असावा.

सन पूर्वकाळात नंद घराणे कोकण प्रदेशात राज्य करीत होते. इसवी सनपूर्व दुसऱ्या व तिसऱ्या शतकात कोकण प्रांतावर मौर्य राजांचा अंमल होता. प्राचीन शिलालेखावरून इसवी सन पूर्व २५० च्या दरम्यान रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा प्रदेश सम्राट अशोकाच्या अधिपत्याखाली होता असे आढळते. ही मौर्य सत्ता नष्ट करून सातवहन राजाने सातवहन राज्य स्थापन केले. इसवी सनाच्या पहिल्या शतकाच्या चौथ्या पदात सातवहनांचे उच्चाटन करून शक राजांनी कोकणांत आपले राज्य स्थापन केले. इ. स. १३३च्या दरम्यान सातकर्णी घराण्याच्या गौतमीपुत्र सातकर्णी नामक राजाने शकांचा पराभव करून, इ. स. २१८ पर्यंत या सातकर्णी घराण्याच्या राजांनी राज्य केले. त्यानंतर वाकाटक घराण्याने इ.स. ५५० पर्यंत राज्य केले. वाकाटकांच्या नंतर वदामीच्या चालुक्यांनी कोकणात सत्ता स्थापन केली. याच चालुक्यांच्या काळातील काही ताम्रपट सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील कांदळगाव येथे, कुडाळ तालुक्यातील नेरूर येथे तसेच वेंगुर्ला तालुक्यातील वेतुरे व कोचरे या गावी सापडले आहेत. या चालुक्य घराण्याच्या जयसिंह राजाने दक्षिणेत स्वारी करून राष्ट्रकूट घराण्याच्या इंद्र राजाचा पराभव करून कोकणात सत्ता स्थापन केली होती. राष्ट्रकूट व चालुक्यांचे मांडलिक शिलाहार यांनीही इ. स. सातव्या शतकात दक्षिण कोकणावर राज्य केले. सिंधुदुर्गातील खारेपाटण येथे या शिलाहारांची राजधानी होती. त्याकाळचे दोन ताम्रपटही तेथे सापडले आहेत. शिलाहारानंतर इ.स. ११८९ ते १३१८ पर्यंत देवगिरींच्या यादवांची येथे सत्ता होती. इ.स. १३१८ मध्ये दिल्लीच्या जलालुद्दीन खिलजीच्या मल्लिक कपूर नामक सेनापतीने कोकण प्रांत जिंकला व मुस्लिम सुलतानांची सत्ता कोकण प्रांतात सुरू झाली.



तदनंतर १३३६ च्या सुमारास विजयनगरच्या बलाढ्य हिंदू राजांचा मुख्य प्रधान माधवाचार्य याने कोकण प्रांतावर स्वारी करून सुलतानाचा पाडाव केला व कोकण प्रांत विजयनगरच्या अंमलाखाली आला. इ.स. १४७३ पर्यंत माधवाचार्यांच्या कुडाळ प्रांतावर होडावडेकर, सावंत-दळवी हे सर्वाधिकारी होते. त्यांना दूर करून प्रभूंच्या मदतीने इ.स. १४७३ मध्ये महंमद गवानने हा कुडाळ प्रांत बहामनी सुलतानाच्या अंमलाखाली आणला व या कुडाळ प्रांताची सत्ता प्रभू राजघराण्याकडे सुपूर्द केली. कुडाळ प्रांत ही प्रभूंची तर रांगणाघाटाच्या दुकानवाड, माणगांव, वेंगुर्ले आदी भागात सावंतांची सत्ता होती व. इ. स. १४९८ मध्ये बहामनी सुलतानाची राजवट मोडून आदिलशहाने कोकण प्रांतावर सत्ता स्थापन केली. खेम सावंतांना १६२७ च्या सुमारास या विजयापूरकरांनी देशमुखी दिली. खेम सावंतांनंतर १६४१ च्या दरम्यान त्यांचे भाऊ लखम सावंत गादीवर आले. या लखम सावंत व छत्रपती शिवाजी महाराज यांच्यात संघर्षही झाला आहे. याचदरम्यान बांदा व वेंगुर्ला भागात अनुक्रमे पोर्तुगीज व डचांनी व्यापाराच्या माध्यमातून अतिक्रमण केले. इ. स. १६५९ मध्ये शककर्ते शिवाजी महाराज व लखम सावंत यांच्यात तह होऊन शिवरायांनी सावंतांना सरदेसाई किताब बहाल केला. इ.स. १६६० च्या दरम्यान शिवरायांनी दक्षिण मोहीमेत खारेपाटण, विजयदुर्ग, रांगणागड (सध्या सर्व सिंधुदुर्ग जिल्ह्यात) ताब्यात घेतले. मात्र शिवाजी महाराजांच्या सैन्याला वारंवार हल्ले करूनही लखम सावंतांच्या कुडाळवर अंमल बसविता आला नाही.

मात्र १६६४ साली शिवाजीशी झालेल्या युद्धात लखम सावंत कुडाळ सोडून पळाले व पोर्तुगीजांच्या आसऱ्यास गेले. पोर्तुगीज शिवरायांना शरण आल्यावर हेच सावंत

शिवरायांना शरण गेले. याच कोकण मोहिमेत शुक्रवार दि. २५ नोव्हेंबर १६६४ रोजी मालवण समुद्रकिनाऱ्यावर दांडी भागातील एका मोठ्या खडकावर शिवरायांच्या हस्ते सिंधुदुर्ग जिल्ह्याचे भूमिपूजन करण्यात आले. सन १६६७ साली किल्ल्याचे बांधकाम पूर्ण झाले. याच सिंधुदुर्ग किल्ल्यावरून सिंधुदुर्ग जिल्ह्यास सिंधुदुर्ग हे नाव देण्यात आले.

इ. स. १६७५ मध्ये लखम सावंतांच्या मृत्यूनंतर त्यांच्या गादीवर त्यांचे पुतणे खेम सावंत आले. इ. स. १६९७ मध्ये खेम सावंतांनी कुडाळ येथे प्रभू घराण्याचा पराभव करून कुडाळ काबीज केले. कुडाळ काबीज केल्यानंतर इ.स. १६९७ मध्येच खेम सावंतांनी सावंतवाडी (सुंदरवाडी) संस्थानाची स्थापना केली. या खेम सावंतांनी स्थापन केलेला राजवाडा आजही सावंतवाडी येथे सुस्थितीत आहे. इ. स. १७०९ मध्ये खेम सावंतांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुतणे फोंड सावंत ऊर्फ अनासाहेब गादीवर आले.

इ.स. १६५९ मध्ये शिवरायांनी मराठ्यांच्या आरमाराची स्थापना केली. इ. स. १६८० मध्ये गोब्राह्मण प्रतिपालक शिवरायांचे निधन होऊन संभाजी राजे स्वराज्याच्या गादीवर बसले. त्याच काळात मराठे आरमाराचे प्रमुख, सरखेल कान्होजी आंग्रे उदयास आले. त्यांनी संपूर्ण कोकणपट्टीवर पोर्तुगीज, डच, इंग्रज व जंजिऱ्याचे सिद्दी यांच्याशी शर्थीने झुंज देऊन मराठी सत्ता प्रस्थापित केली. संपूर्ण मराठी आरमाराची धुरा सांभाळण्यासाठी आंग्रे घेरीया ऊर्फ आजच्या विजयदुर्ग किल्ल्यावर राहात. तेथूनच त्यांनी भीमपराक्रम करून संपूर्ण कोकणातून परकीय व मुस्लिम मुघलांना हाकलून मराठी अधिसत्ता स्थापन केली.

फेब्रुवारी १७०८ मध्ये शिवाजी महाराजांच्या स्नुषा महाराणी ताराबाई व त्यांचे सुपुत्र शिवाजी यांना छत्रपती शाहूंच्या सैन्यामुळे सुरक्षित वाटेना म्हणून त्या रांगणागडावर (सध्या सिंधुदुर्गात) येऊन राहिल्या. तेथे काही दिवस वास्तव्य केल्यावर त्या सिंधुदुर्ग किल्ल्यावर राहायला गेल्या. दरम्यान कोकण प्रांत ताब्यात घेण्यासाठी विजयदुर्ग व देवगड किल्ल्यावर इंग्रजांनी आरमारी हल्ले केले. परंतु आंग्रे यांच्या आरमारापुढे इंग्रजी आरमार असहाय्य, कुचकामी ठरले. हीच गत विजयदुर्गावर हल्ला करणाऱ्या डचांची झाली.

छत्रपती शाहू व करवीरकर संभाजी राजे यांतील भाऊबंदकीचा वाद १३ एप्रिल १७३१ रोजी वारणा तहाने मिटला. त्या तहानुसार संभाजी राजाच्या वाट्याला कोकण प्रदेश (सिंधुदुर्गासह) आला. या तहानुसार सावंतवाडीचे संस्थानिक सावंत-भोसले तसेच विजयदुर्ग, देवगड, मालवण या परिसरातील राज्यकर्ते छत्रपती संभाजींच्या अधिपत्याखाली आले. इ. स. १७३८ मध्ये सुंदरवाडीचे राजे फोंड सावंतांचे निधन झाल्यानंतर त्यांचे नातू जयराम सावंत सत्ताधीश झाल्यानंतर पोर्तुगीजांनी केलेल्या हल्ल्यात पेशव्यांच्या आश्रयामुळे व मदतीमुळे पोर्तुगीज व सावंत भोसले यांच्यात तह झाला. यादरम्यान तुळाजी आंग्रे यांनी दक्षिण कोकणचा प्रदेश नानासाहेब पेशव्यांच्या हवाली केला. त्यानंतर इ.स. १७४३ मध्ये सरखेल तुळाजी आंग्रे यांनी मोठ्या सैन्यानिशी सावंतवाडीच्या सावंत-भोसल्यांवर हल्ला केला. या सावंत-भोसल्यांचा बांबर्डे (ता. कुडाळ) येथील लढाईत पराभव झाला. परंतु राजा जयराम सावंतांचा पुतण्या रामचंद्र सावंत याने तुळाजी आंग्रेला पकडून कैद केले. त्यामुळे आंग्रे व सावंत-भोसले यांत तह होऊन कुडाळ प्रांतातील बारा महालांपैकी पाच महाल तुळाजींच्या ताब्यात आले. त्यानंतर १७४६ मध्ये पोर्तुगीजांनी सावंतवाडकरावर हल्ला करून सावंतांचे आरमार नष्ट करून सावंतांच्या ताब्यातील तेरेखोल किल्ला प्रथम मिळविला व त्यानंतर रेडीचा (ता. वेंगुर्ला) यशवंतगडही जिंकून घेतला. त्यानंतर १७४८ मध्ये सावंतवाडकरांच्या ताब्यातील निवती किल्लाही पोर्तुगीजांनी जिंकला. इ. स. १७६५ मध्ये इंग्रजांनी


यशवंतगड (रेडी - वेंगुर्ला तालुका) व भरतगड (मसुरे - मालवण तालुका) जिंकून घेतला. त्यानंतर इंग्रज व सावंतवाडकर यांच्यातील एका तहानुसार सावंतांचे वेंगुर्ला बंदर इंग्रजांच्या मार्फत बिटोजी कामत यांच्याकडे गहाण पडले. ते नंतर १७८० मध्ये सावंत-भोसल्यांनी हल्ला करून जबरदस्तीने ताब्यात घेतले.

१३ फेब्रुवारी १७६५ रोजी इंग्रजांनी आंग्रे यांच्या आरमाराचा पाडाव करून विजयदुर्गावर युनियन जॅक फडकवला. आंग्रे यांचे आरमार नष्ट झाल्याने पुढे इंग्रजांनी सिंधुदुर्ग व यशवंतगडही ताब्यात घेतला. १२ ऑक्टोबर १७५६ रोजी पेशवे व इंग्रज यांत वाटाघाटी होऊन विजयदुर्ग पेशव्यांच्या ताब्यात गेला.

इ.स. १८१८ मध्ये मराठेशाहीचा अस्त झाल्यानंतर कोकणात इंग्रजांचा अंमल सुरू झाला. तेव्हापासून १९४७ला भारत स्वतंत्र होईपर्यंत कोकण इंग्रजांच्या ताब्यात होते. प्रजासत्ताक भारतात संपूर्ण कोकणपट्टीचे ठाणे, रायगड व रत्नागिरी या तीन जिल्ह्यांत विभाजन झाले. रत्नागिरी जिल्ह्यातील स्थानिक लोकांच्या मागणीमुळे १ मे १९८१ रोजी अखंड रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन सिंधुदुर्ग जिल्हा अस्तित्वात आला.[३]

## सिंधुदुर्ग जिल्ह्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी -

सिंधुदुर्ग जिल्ह्याला अनेक कला, लोककलांची समृद्ध परंपरा शत-शतकांपासून लाभलेली आहे. महाराष्ट्राच्या इतर भागांपेक्षा या कोकण भागाचे देव, श्रद्धा व रीतीरिवाज खूप भिन्न आहेत. जीवनशैली भिन्न आहे. पर्यायाने या सर्वांचे प्रतिबिंब या कला-लोककलांतून उमटते. अशा या कलेने समृद्ध-संपृक्त कोकणात सिंधुदुर्ग जिल्हा या कला लोककलांच्याबाबतीत अधिकच श्रीमंत आहे. या सिंधुदुर्गाच्या शिवप्रभूंच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत खेड्यापाड्यांतून विखुरलेल्या, तळागाळाच्या माणसांपर्यंत पोहोचून त्यांचे मनोरंजन करीत मालवणी संस्कृतीच्या परिपोष करणाऱ्या, लोकशिक्षणाचे साधन झालेल्या अनेक लोककला आहेत. या मुलखाला स्व:तची अशी खास संस्कृती आहे.



या लोककलांतील सुप्रसिद्ध व लोकप्रिय कला म्हणजे दशावतार नाट्यकला होय. उत्सवप्रिय मालवणी माणूस देवांच्या वार्षिक जत्रा, देवांचे रथोत्सव आदी उत्सवांच्या माध्यमातून या कलेचा आविष्कार करता करता आज राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पातळीवर विष्णूचे हे दशावतार घेऊन पोहोचला आहे. उत्सव-जत्रा-देव, त्यांचे तरंग आणि देवाला घातलेली गाऱ्हाणी (साकडे) यांची बनलेली सिंधुदुर्गाची श्रद्धावान संस्कृती आहे. या संस्कृतीत होळी उत्सवात ढोल - ताशांच्या जल्लोषातील 'रोंबाट' आहे. तसेच 'भावना जपून नम्रतेने' केले जाणारे भजनही आहे. येथे रोंबाटाशिवाय शिमगा नाही आणि भजनाशिवाय गणपती नाही. पुरुषांना जसे भजन प्रिय तसेच येथील स्त्रियांना 'फुगड्या' प्रिय आहेत. 'फुगडी' हा सणासुदीला विशेषत: श्रावणात तसेच गौरी-गणपतीत स्त्रियांकडून घराघरांतून साजरा होणारा स्त्री-लोककला प्रकार आहे.

सिंधुदुर्गातील बहुरंगी कला म्हणजे पिंगुळी. (ता. कुडाळ) या गावच्या ठाकर समाजाच्या कलाकारांची लोककला होय. पिंगुळी गावचे हे ठाकर लोक, कलाकार चित्रकथी व कळसुत्री या कलांबरोबरच पिंगळी, पांगुळ बैल (नंदीबैल), पोवाडे, कळबाहुली, गोंधळी, शिमग्यातील (होळी उत्सवातील) राधा व स्त्री-गीते अशा

३ महाराष्ट्र शासन - जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - सिंधुदुर्ग जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई, १९९६-९७

४पाटणकर, सतीश (संपा.) कौल - कोकण लोककला विशेषांक, को.म.सा.प. शाखा प्रकाशित, जिल्हा मुख्यालय, सिंधुदुर्ग, अंक पहिला, डिसें. १९९९

विविधरंगी कला पारंपारिक पद्धतीने आजही सादर करतात.[५] या प्रत्येक कलेचे एक वेगळे वैशिष्ट्य आहे. सादरीकरणाची एक वेगळी पद्धत आहे. त्यामुळेच या ठाकर कला चित्तवेधक व मनोहारी वाटतात. एका जमातीने एवढ्या मोठ्या प्रमाणात स्वत:च्या पारंपारिक लोककलांची जोपासना करून ठेवणारे अखंड महाराष्ट्रातील ठाकर समाज हे एकमेव उदाहरण असेल. या ठाकर लोककलांतून लोकवाङ्मयाचे, लोकसंगीताचे व लोकनाट्याचे वेगवेगळे आविष्कार पहावयास मिळतात.

सिंधुदुर्गाच्या या मौल्यवान संस्कृती-संपत्तीमधील आणखी एक हिरा म्हणजे सावंतवाडी येथील लाकडी खेळणी व लाखकाम होय, त्याचबरोबर भुंग्याच्या पंखांपासून बनवलेले पडदे, लाकडी फळे, बुरूड काम याही कला सावंतवाडीने जोपासल्या आहेत. सावंतवाडी संस्थानचे कलासक्त स्वर्गीय श्रीमंत शिवरामराजे भोसले यांच्या अथक परिश्रमामुळे आज सिंधुदुर्गच्या या निसर्गरम्य व कलापूर्ण सावंतवाडीला जगाच्या नकाशावर स्थान मिळाले आहे. येथील लाकडी खेळणी जगप्रसिद्ध तर आहेतच, पण आणखी एक गोष्ट अशी आहे, जी अखंड पृथ्वीतलावर फक्त सावंतवाडीतच तयार होते, ती म्हणजे विष्णूच्या दशावतारावर - विष्णूपुराणावर आधारित 'गंजिफा' ही होय. गंजिफा हा थोडाफार पत्त्यासारखा खेळ असून त्याला पुराणकालीन परंपरा आहे. सावंतवाडीचे संस्थानिक स्व. शिवरामराजे भोसले यांनी स्वत: विशेष रस घेऊन विष्णुपुराणाप्रमाणेच छत्रपती शिवरायांच्या चरित्रावर आधारित आणि संतपुराणावर आधारित असे गंजिफा खेळाचे संचही लाखेपासून स्वत: तयार केले.[५] खऱ्या अर्थाने एका कलेला राजाश्रय मिळाला.

लोकसंगीत, लोकगीत, लोकनाट्य आदी विविध कला व लोककलांनी सिंधुदुर्गाची संस्कृती ओतप्रोत भरलेली असून त्या संस्कृतीविषयी थोडक्यात सांगणे व लिहिणे केवळ अशक्य आहे.

५ भोसले, शिवरामराजे - सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हस्तकला उद्योग विकास, खेमराजीय - षष्ठ्यब्दीपूर्ती विशेषांक, श्री पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी, १९८७-८८

### सिंधुदुर्ग जिल्ह्याची शैक्षणिक पार्श्वभूमी -

सिंधुदुर्ग जिल्ह्याला जशी वैभवशाली ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे, समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे, त्याचप्रमाणे या सिंधुदुर्ग जिल्ह्याला गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपराही लाभलेली आहे. सावंतवाडी संस्थानात तर सन १८३८ पूर्वी राजघराण्यातील मुले, सरदार-दरखदार यांची मुले यांना शिकविण्यासाठी राजवाड्यात एक शाळा होती. गावातील लोक सोयीनुसार पंतोजी ठेवून मुलांना शिक्षण देत. अशातऱ्हेच्या लोकाश्रयावर चालणाऱ्या शाळांची संख्या सन १८४० च्या नोंदणीनुसार सुमारे ३५ च्यावर होती व या शाळांतून सुमारे पाचशेहून जास्त विद्यार्थी शिक्षण घेत होते.[६] या संस्थान काळात येथे इंग्रजी माध्यमांच्या शाळा, उर्दू माध्यमांच्या शाळा, कन्याशाळा, व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या तंत्रशाळा, संगीतशाळा, ग्रंथालये, स्त्रियांसाठी विशेष फिरते वाचनालय, व्यायामशाळा, रात्रीच्याही शाळा होत्या. त्याचबरोबर रयतेला शिक्षणाविषयी आवड निर्माण व्हावी म्हणून विद्यार्थ्यांना केरोसीन पुरवठा, हुशार विद्यार्थ्यांच्या पालकांना शेतसाऱ्यात सूट आदी सवलती दिल्या जात. हुशार विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी संस्थान स्वखर्चाने पुणे येथे पाठवत असे. या उच्च शिक्षणाची थोडी सोय संस्थानातच व्हावी, या सद्हेतूने पुण्यश्लोक बापूसाहेब महाराज यांनी संस्थानातच राणीपार्वती देवी कनिष्ठ महाविद्यालय सन १९४४ साली स्थापन केले. या महाविद्यालयाचा सर्व खर्च संस्थान करत होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन

६ फळेकर, जी डब्ल्यू (शि.स. अध्यक्ष) - सावंतवाडी शिक्षण समितीचा अहवाल - जानेवारी, सन. १९३१.

७ Website of Shri Pancham Khemraj Mahvidyalaya. http://www.geocities.com/spk_college/index.html

झाल्यानंतर हे महाविद्यालय मुंबई बोर्डाकडे सुपूर्द केले गेले. त्यानंतर मुंबई बोर्डाने या महाविद्यालयावर खर्च करण्यास नकार दिला व त्याचबरोबर दुष्काळातील तेराव्या महिन्याप्रमाणे सावंतवाडी भागात मलेरियाची साथ पसरल्यामुळे ते महाविद्यालय बेळगाव येथे सन १९४८ मध्ये हलविण्यात आले. बेळगाव (कर्नाटक) येथे आजही सुरू असलेले राणी पार्वतीदेवी महाविद्यालय हे बेळगाववासीयांना सावंतवाडीकरांनी दिलेली देणगी आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्वात पहिले महाविद्यालय श्रीपंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी हे असून त्याची स्थापना १९६१ साली झाली.[८] त्यानंतर आज सिंधुदुर्ग जिल्ह्यात १० महाविद्यालये आहेत. त्यापैकी सावंतवाडी व कणकवली तालुक्यांत प्रत्येकी दोन महाविद्यालये, तर दोडामार्ग, कुडाळ, वेंगुर्ला, देवगड, वैभववाडी व मालवण या तालुक्यात प्रत्येकी एक महाविद्यालय आहे. म्हणजेच एकूण आठ तालुक्यात दहा महाविद्यालये आहेत. ही महाविद्यालये मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहेत. या महाविद्यालयांव्यतिरिक्त सिंधुदुर्गात वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयेही आहेत. त्यापैकी सावंतवाडी येथे एक आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय, वेंगुर्ला येथे एक होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय, हरकुळ कणकवली येथे एक अभियांत्रिकी महाविद्यालय आहे. याशिवाय नुकतेच एक कृषी महाविद्यालयही मालवण येथे सुरू केले आहे. तसेच सावंतवाडी येथे एक फाईन आर्ट महाविद्यालयदेखील आहे.

सिंधुदुर्गात देवगड येथे एक बी.एड. महाविद्यालय तर मिठबांव, कणकवली, मालवण, डिंगस, आजगाव व कुडाळ येथे डी.एड. महाविद्यालय आहे. यापैकी कुडाळ येथील डी.एड. महाविद्यालय हे शासकीय अध्यापक विद्यालय आहे. याव्यतिरिक्त मालवण येथे शासकीय पॉलिटेक्निकही असून संपूर्ण जिल्ह्यामध्ये एकूण सात आय.टी.आय. आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४१ उच्च माध्यमिक विद्यालये, २०० माध्यमिक विद्यालये, तर १४६८ प्राथमिक शाळा आहेत.

याव्यतिरिक्त सावंतवाडी येथे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महाविद्यालयाचे एक केंद्र आहे. तसेच सावंतवाडी, कणकवली व वेंगुर्ला येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची अभ्यासकेंद्रे असून ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. कारण या मुक्त विद्यापीठाच्या केंद्रातून केवळ सिंधुदुर्गातील विद्यार्थी नाही, तर गोवा राज्याच्या व कोल्हापूर, रत्नागिरी आदी शेजारच्या जिल्ह्यांतूनही विद्यार्थी शिक्षणासाठी सिंधुदुर्गात येतात. विशेषत: श्रीराम वाचन मंदिर, सावंतवाडी या य.च.म.मु. विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी-पदव्युत्तर शिक्षणक्रम व वृत्तपत्रविद्या पदविका (Diploma in Journalism) या शिक्षणक्रमाचा फायदा घेण्यासाठी या सिंधुदुर्ग जिल्ह्याबाहेरूनही विद्यार्थी येतात.

संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील सर्वप्रथम शंभर टक्के साक्षर जिल्हा होण्याचा बहुमान सिंधुदुर्ग जिल्ह्याला मिळाला आहे.

**-: सिंधुदुर्ग जिल्ह्याविषयी इतर माहिती :-**

**भौगोलिक स्थान -**

जुन्या रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन १ मे १९८१ रोजी सिंधुदुर्ग जिल्हा अस्तित्वात आला. जुन्या रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी, कुडाळ, वेंगुर्ला, मालवण, कणकवली व देवगड हे सहा तालुके व कोल्हापूर जिल्ह्यातील एक तालुका वैभववाडी अशा एकूण सात तालुक्यांच्या एकत्रिकरणातून सिंधुदुर्ग जिल्ह्याची निर्मिती झाली. सावंतवाडी या तालुक्याचे दि. १२ नोव्हेंबर २००१ रोजी विभाजन होऊन दोडामार्ग या नवीन तालुक्याची निर्मिती झाल्यामुळे सध्या या जिल्ह्यात एकूण आठ तालुके

८,९,१० - महाराष्ट्र शासन - जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - सिंधुदुर्ग जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई १९९६-९७

आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या पूर्वेस कोल्हापूर जिल्हा, दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बेळगाव जिल्हा व गोवा राज्य, उत्तरेस रत्नागिरी जिल्हा तर पश्चिमेस अरबी समुद्र आहे. या जिल्ह्याचे अक्षांश-रेखांशात्मक स्थान दक्षिणोत्तर १५.३७' ते १६.४०' अक्षांश व पूर्व-पश्चिम ७३.१९' ते ७४.१३' रेखांश असे आहे.[४]

**क्षेत्रफळ व प्रशासकीय विभाग -**

सिंधुदुर्ग जिल्ह्याचे क्षेत्रफळ ५०७८ चौ. कि. मी. असून महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ते केवळ १.६५ टक्के एवढेच आहे. प्रशासकीय कारभाराच्या सोयीसाठी जिल्ह्याचे (१) सावंतवाडी व (२) कणकवली असे दोन प्रशासकीय उपविभाग पाडले असून १ नोव्हेंबर १९९४ पासून जिल्हा मुख्यालय ओरोस या जिल्हा केंद्राच्या ठिकाणी स्थलांतरित केले आहे. या जिल्ह्यामध्ये सावंतवाडी, वेंगुर्ला व मालवण या तीन नगर परिषदा असून या जिल्ह्यातील एकूण आठ तालुक्यांमध्ये ७३६ खेडी आहेत. या जिल्ह्यात १९९६-९७ मध्ये ४२८ ग्रामपंचायती - ग्रुप ग्रामपंचायती होत्या.[५]

**लोकसंख्या -**

१९९१ च्या जणगणनेनुसार सिंधुदुर्ग जिल्ह्याची लोकसंख्या ८,३२,१५२ होती. त्यापैकी पुरुषांची लोकसंख्या ३,८९,३८४ व स्त्रियांची लोकसंख्या ४,४२,७६८ एवढी असून दर हजार पुरुषामागे १,१३७ स्त्रिया होत्या. जणगणना १९८१ च्या लोकसंख्येच्या तुलनेत १९९१ च्या लोकसंख्येत ६.५६ टक्क्यांनी वाढ झालेली असून १९९१ च्या जनगणनेनुसार येथील लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. ला १६४ एवढी होती.[५]

**कु. राखी प्रभुखानोलकर**
ई-४८, खासकीलवाडा,
सावंतवाडी - ४१६५१०

## जानेवारी २००४ - दिनविशेष

३ सावित्रीबाई फुले जयंती / महिला मुक्ती दिन

४ जागतिक ब्रेली दिवस / जागतिक नेत्रदान दिवस

७ जागतिक संसद दिवस

९ गुरू गोविंदसिंग जयंती

१२ स्वामी विवेकानंद जन्मदिवस / राष्ट्रीय युवक दिन

१४ भूगोल दिवस / मूकबधीर दिवस

१५ भारतीय स्थलसेना दिवस / जागतिक धर्म दिवस

१६ पल्स पोलिओ डोस दिवस / महादेव गोविंद रानडे पुण्यतिथी

१८ जिजामाता जयंती

२१ विद्यार्थी दिवस

२३ नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती / राष्ट्रीय देशभक्ती / राष्ट्राभिमान दिवस

२३ भारत पर्यटन दिवस

२६ भारतीय गणराज्य दिवस / आंतरराष्ट्रीय चालीरीती दिवस

२८ रथसप्तमी / लाला लजपतराय जयंती / जागतिक सूर्यनमस्कार दिवस

३० महात्मा गांधी पुण्यतिथी / हुतात्मा दिवस/ जागतिक कुष्ठरोग विरोध दिन

३१ राष्ट्रीय पक्षी दिवस

**संकलन : विजय देवधर**
गौरीशंकर, १४, गोवर्धन सोसायटी,
वीर सावरकर नगर, पुणे - ४११०३७
दूरध्वनी : ४२६४०३२

# लेखांक पहिला - श्री तुकाराम महाराज (संक्षिप्त माहिती)

*संत साहित्य व संतजीवनाचे अभ्यासक श्री. शंकरराव मठ यांचा ओघवत्या शैलीतील हा लेख. - संपादक*

## श्री तुकारामांचे घराणे

तुकोबांचे घराणे संभावित व संपन्न स्थितीतले होते. तुकोबांच्या वेळची देहू गावची स्थिती अगदीच खेड्यात गणना होईल अशी नव्हती. तेव्हाही ते लहानसेच क्षेत्र होते. तुकोबा आपल्या जन्मभूमीविषयी म्हणतात -

धन्य देहू गांव पुण्यभूमि ठाव, तेथे नांदे देव पांडुरंग ।

धन्य क्षेत्रवासी लोक दईवाचे उच्चारती वाचे नामघोष ।७८९

मंबाजीसारखी माणसे उदरनिर्वाहार्थ त्या गावी जाऊन राहात व धंदा चालवीत. तुकोबांचे आई-बाप कनकाई व बोलहोबा यांचा संसार चांगला सुखाचा गेला. त्यांच्याकडे बडिलार्जित महाजनकी, शेती व सावकारी होती. त्यांचे वाण्याचे दुकानही चांगले चालले होते.

ते परम धार्मिक होते. विठोबाची भक्ती पूर्वीपासून चालत आली होती. बोलहोबा पंढरीची वारी नियमाने करीत. व्यवहारात ते नेकीने वागत. प्रपंच व्यवहाराकरिता, तेथे न बोले असत्य कथा, असा त्यांचा लौकिक होता. ते गरिबांना मदत करीत आणि साधूसंतांचा आदर करीत. वारकरी संप्रदायातील कनकाई असल्याने भक्तिपर अभंग, पदे, भूपाळ्या, आरत्या तोंडपाठ येत. नामदेव, जनाबाई यांचे अभंग इत्यादी त्यांना येत असत. स्वभावत: कनकाई भाविक व सुशील होती. तुकोबांना बाळकडू आई-बापांपासून मिळाले. तुकारामांचे आईबापांवर गाढ प्रेम होते. ते म्हणत -



*आईबापे केवळ काशी । तेणे न च जावे तीर्थासी ।*

*पुंडलीके काय केले । परब्रह्म उभे ठेले ।*

*तैसा होई सावधान । हृदयी धरी नारायण ।*

*तुका म्हणे मायबाप । अवघी देवाची स्वरूपे ।* २१०६

आईबापांच्या ठिकाणचे प्रेम अकृत्रिम होते. तुकोबांची सद्‌विचार शक्ती व विवेक जागृत असत. आंधळ्याप्रमाणे वडिलांनी पाडलेली चाल न स्वीकारता स्वत: विचार करावा, असे ते म्हणत -

*न धरावी चाली करावा विचार । वरील आहार गळी लावी।*

तुकोबा अशाप्रमाणे सुधारक होते.

## घरातील रीतीरिवाज, तुकोबांचा स्वभाव

तुकोबांचा मोठा भाऊ सावजी विरक्त वृत्तीचा होता. तुकारामांना वडिलांनी हाताशी धरले. तुकाराम तरबेज व चलाख होते. तुकोबा सचोटीने वागत त्यामुळे गिऱ्हाईकांचा विश्वास बसे. आई-बापांच्या छत्राखाली तुकारामांचे जीवन सुखासमाधानात गेले. तेव्हाच्या रीतीरिवाजाप्रमाणे त्यांचे लग्न अवघ्या चौदाव्या वर्षी झाले. पहिली बायको रखुमाबाई सुशील व प्रेमळ होती. तिला दम्याची व्यथा होती. म्हणून पुण्याचे श्रीमंत सावकार, गुळवे यांच्या मुलीशी तुकोबाचे दुसरे लग्न झाले. आई, वडील, भाऊ, भावजय, तुकोबा व त्यांच्या दोन बायका, कान्होबा, त्याची बायको इतकी माणसे एका घरात सुखाने नांदत होती.

या चलतीच्या काळीदेखील तुकोबा धर्मपरायण असल्याने त्यांची परमार्थ साधना चालूच होती. संसार हा देवाने आपल्यामागे लावून दिला आहे. परमेश्वराला स्मरून संसारात

आपल्या वाट्याला येणारी कर्तव्ये नेकीने व सचोटीने करणे, सदाचाराने वागणे, आपणाप्रमाणे इतरांना मानणे हाच भवसागर तरून जाण्याचा मार्ग आहे. देवाने आपल्यावर लादलेली जबाबदारी झुगारून पळून जाण्याचा यत्न केला तर आपण कामचुकार ठरू. आपल्या वाटेला आलेली कर्तव्ये चांगल्या रीतीने करणे हाच आपला स्वधर्म. त्याचा त्याग करता येत नाही. संन्याशाचा धर्म चांगला वाटला तरी तो आपला धर्म नाही. परधर्म आहे म्हणून भयावह आहे.

'स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह: । गीता ३/३५

## तुकोबांच्या परमार्थ सोपानाचे तीन टप्पे

तुकाराम प्रथमपासूनच भाविक व सदाचार संपन्न होते. आईबापांची सेवा, धार्मिक ग्रंथवाचन, भजन, पूजन करीत असत. हा त्यांच्या आयुष्यातील पहिला भाग. काळ बदलला. आईबाप निवर्तले, वडील-भावजय मरण पावली. भाऊ विरक्त होऊन निघून गेला. दिवाळे निघाले. लोक निंदू लागले. तुकारामांना संसाराचा वीट आला. त्यांना एकांतवास प्रिय वाटू लागला. जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटण्याची इच्छा प्रबळ झाली. वृक्ष व वनचर यांच्याशी सहवास घडावा, अशी इच्छा झाली. अंत: कलह, अशांती ओसरली. देवाच्या दर्शनाची तळमळ लागली, हा आयुष्याचा दुसरा भाग.

पुढील आयुष्यात देवाशी सख्य घडले. देव सखा झाला. देवामुळे अवघे जन सोयरे प्राणसखे झाले. या अवस्थेत संसाराचे स्वरूप पालटून गेले. जन्ममरणाची भीती नाहीशी झाली. मला मुक्ती नको, मला वेळोवेळ जन्माला घाल, मात्र तुझे अखंड स्मरण घडू दे आणि माझ्या हातून तुझी सेवा घडू दे -

*नलगे मुक्ती धनसंपदा । संत संग देई सदा ।*
*तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।*

२३०६।२,३

मनाचा संकुचितपणा नाहीसा झाला. जनी जनार्दन, विश्वी विश्वंभर दिसू लागला. त्यांचा संसार अधिक व्यापक झाला. निष्काम बुद्धीने प्रेमस्वरूप परमेश्वराकडे दृष्टी ठेवून ते संसार करू लागले. बायकोला वरच्या पायरीवर आणले. मुलींची लग्ने लावली. कीर्तनाद्वारा जनतेला उपदेश करून सर्वकाळ जनहित साधण्यात घालवू लागले. अवघे जन त्यांना ब्रह्ममय झाले. त्यांचा अहंभाव ब्रह्मभाव झाला, हा आयुष्याचा तिसरा भाग. तुकोबांच्या जीवनातील परमार्थ सोपानाच्या या तीन पायऱ्या आहेत. या तीन भागांचे मिळून एकच अखंड जीवन आहे.

## आपत्तीची प्रत्यक्ष झळ

तुकोबांच्या जीवनात प्रथम दु:ख आईबापांच्या निधनाने आले. दुष्काळ पडला. थकबाकी वसूल होईना. पैशाची टंचाई भासू लागली. रखुमाबाईचे दुखणे दुणावले. ती त्यातच गेली. ही गोष्ट तुकोबांना फार जाणवली. दिवस वाईट आले. उपासमार होऊन पत्नी गेली असे त्यांना वाटले. व्यापार करण्यास पैसे नव्हते. पत चांगली होती. कर्ज काढून व्यापारास सुरुवात झाली. यश आले नाही. तुकोबांना लोक दोष देऊ लागले. तुकोबा भावडे नव्हते. पण दुसऱ्यांच्या अडचणीकडे सहानुभूतीने पाहण्याच्या वृत्तीमुळे स्वत: धस सोसून ते मदत करीत. विठ्ठलाची भक्ती करता म्हणून तुम्हाला हे दिवस आले, असे लोक म्हणत. कर्जाचा बोजा वाढला. सावकार तगादा लावू लागले. तुकोबा म्हणतात - *उगाच कर्ज घेतले । होते नाही ते सरले आता आणिक माथा ऋण झाले ।*

कर्जाचा बोजा असह्य झाला. त्यातून सुटण्याचा मार्ग दिसेना. मिरच्या कोकणात नेऊन विकल्या. भल्या माणसाला तेथील लोकांनी चकविले. थोडे पैसे घेऊन परत येत असता एका लफंग्याने पितळी कडी सोने म्हणून दिली. पैसे लांबविले. एकदा मीठ घेऊन विकले. त्यातून गूळ खरेदी करून विक्री केली. परत येत असता एका दरिद्री ब्राह्मणाची

करुणा येऊन आपल्याजवळचे पैसे त्याला देऊन टाकले.

*भूतांची दया हे भांडवल संता । आपुल्या ममता नाही देही।*

आपल्याला व्यवहार परवडणारे नाही, कर्ज मात्र होत राहते. या साऱ्याला आपण कमी पडतो म्हणून विठ्ठलालाच साकडे घालावयाचे ठरवून भामनाथ पर्वतावर भजन व हरिस्मरण करीत बसले. कान्होबाने तुकोबांना शोधून काढले. समजूत काढूनत्यांना घरी आणले.

**संकटासंबंधी दृष्टिकोन -**

कठीण प्रसंग आल्याशिवाय माणसाच्या अंगी असलेले गुण उजेडात येत नाहीत. संकट म्हणजे उन्नयनावस्था प्राप्त करून देणारी साधने आहेत. ज्याच्यावर देवाचे प्रेम असते त्याच्यावर संकटे आणून देव त्याला तावून सुलाखून काढतो. देवावर भार ठेवून संकटाला तोंड देण्याने परम परमार्थाचा लाभ घडतो. कुंती म्हणते, विपद: सन्तु न: शश्वत् । आम्हावर वारंवार संकटे येवोत. येथे हेच तत्त्व विशद केले आहे. संकटावर संकटे आली तसे तुकोबा देवाच्या अधिकाधिक सन्निध गेले. तुकोबांचे चरित्र म्हणजे ते देवाकडे कसे गेले - तुकोबा म्हणतात,

*माझे मन पाहे कसून । चित न ढळे तुजपासून ।*
*कापून देईन शिर । पहा कृपण की उदार ।*
*मजवर घाली घण । परी मी न सोडी चरण । ३११३*

अशाप्रकारे आध्यात्मिक मार्गात तुकोबांची अधिकच प्रगती होत गेली. साधुसंत आपणावर येणाऱ्या संकटांचा फायदा घेऊन परमार्थाच्या मार्गात आपली उन्नती करून घेतात. संकटाच्या पायऱ्या चढून ते परमार्थाच्या महालात प्रवेश करतात. हे न कळणारी मंडळी विपरित अर्थ लावत बसतात. देवाजवळ करुणा भाकण्यात ज्याला कमीपणा दिसतो त्याला भक्तिभावाचे मर्म कळले नाही असे म्हणावे लागेल.

प्रसंग आल्यावर हातपाय गाळून बसण्यात अर्थ नाही. धीर धरून पुढील मार्गाला लागले पाहिजे. अशावेळी मनाचे समाधान हरतऱ्हेने करावे लागते. कर्माचे बरे-वाईट फळ, जे होते ते बऱ्यासाठी, वाईटातूनही चांगले निष्पन्न होते हा भाव. बरेवाईट कर्मही मंगलकारक. वादळातही दयासागर प्रभूची मंगललीला दृगोचर होते.

सगळे गेले बरे झाले. मायापाशातून मुक्त झालो. देवाने चिंता नाहीशी केली. हे मनाचे समाधान धीर देण्यासाठी आहे. हे विसरून कसे चालेल. शोक न करता झाले ते होऊन गेले असे मानणे यातच उन्नतीचे पुढचे पाऊल टाकण्याचे बीज आहे. संकटाच्या पायऱ्या चढूनच उन्नतीचे शिखर मानवाने गाठले पाहिजे. बीज नष्ट झाले तरी प्रचंड वृक्ष निर्माण होणार आहे. त्यात आनंद आहे, अशी तुकोबांची मनोभूमिका होती.

**तुकोबांचे शिक्षण -**

तुकोबांचे घराणे वारकरी पंथाचे. संतवाङ्मयाशी परिचय. तुकोबांना लिहिणे-वाचणे येत होते. कीर्तन-भजन याजकडे विशेष ओढा. कवित्वस्फूर्ती त्यांना नामदेवांपासून मिळाली. नामदेवाने घेतलेले काम पुरे करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असे तुकोबांना वाटे. नामदेव, जनाबाई, गोरा कुंभार, सेना न्हावी, कान्होपात्रा, चोखामेळा, ज्ञानदेव, मुक्ताबाई, एकनाथ यांची अभंगपदे त्यांनी तोंडपाठ केली. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि भावार्थ रामायण यांचे काळजीपूर्वक अध्ययन केले. तुकोबांना ब्रज भाषा चांगली येत होती. त्यांनी या भाषेत काही कवने केली आहेत.

संसाराचे व लोकव्यवहाराचे अवलोकन त्यांच्या काव्यातून आढळते. नवनीताप्रमाणे त्यांचे हृदय कोमल होते. अनुभव, पारमार्थिक अधिकार, देवदर्शन लालसा, आत्मनिवेदन, साक्षात्कार या साऱ्या अनुभवाच्या योगाने काव्य नटलेले आहे. वेदाध्ययन वेदपठणाचा अधिकार

आपणास नाही असे तुकोबा मानीत. अधिकार ज्यांना होते ते देखील सारे वेदपठण करीत नाहीत. तुकारामांनी वेदशास्त्र अवलोकन करून सार काढले.

*वेद अनंत बोलिला अर्थ इतकाची साधिला ।*
*विठोबासी शरण आवे निजनिष्ठे नाम गावे । ४०६१*

*सकल शास्त्रांचा विचार अंती इतकाचि निर्धार ।*
*अठरा पुराणे सिद्धांत तुका म्हणे हाचि हेत । ४०६१*

*वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा ।*
*येरानी वाहावा भार माथा । २२६६*

*पाहिली पुराणे । धांडोळली दरषणे ।*
*न बोले वेदान्तीचा सार।*

ईश्वराचे सामर्थ्य व चातुर्य सृष्टीत कसे दिसून येते हे पाहून ईश्वराच्या ठायी मती लीन करावी एवढा सर्व शास्त्रांतून त्यांनी निष्कर्ष काढला.

*विश्वी विश्वंभर । बोले वेदान्ताची सार । जगी जगदीश। शास्त्रे वदती सावकाश ।*

*व्यापिले हे नारायणे । ऐसी गर्जती पुराणे । जनी जनार्दन । संत बोलती वचन । ३७४७*

तुकोबांना जन्माचे सार्थक करावयाचे होते. विश्वंभराचे दर्शन घ्यावयाचे होते. सकल शास्त्रांचे सार ग्रहण करण्याची प्रबळ इच्छा होती. या दृष्टीने वेद, शास्त्रे, पुराणे यांच्याकडे पाहिले व आपल्याला हवे तेवढे त्यातून काढून घेतले. भक्ती करण्यास साधन एवढ्यापुरतेच शास्त्राचे महत्त्व आहे असे ते मानीत.

**कवित्वाविषयी दृष्टांत**

नामदेवांनी शतकोटी अभंग रचण्याचा संकल्प केला. नामदेवांच्या घरातील सर्व माणसे अभंग रचू लागली. ९४,४०,०००,०० अभंग रचले. ललित अभंग ९ लाख झाल्यावर नामदेव निवर्तले. नामदेवाने विठोबासह स्वप्नात येऊन तुकोबांना अभंग पूर्ण करण्याची गोष्ट सांगितली. या दृष्टांताप्रमाणे तुकोबा अभंग करू लागले आणि त्यांनी शतकोटीची प्रतिज्ञा पुरी केली.

*नामदेवे केले स्वप्नामार्जी जागे । सवे पांडुरंगे येऊनिया।*
*सांगितले काम करावे कवित्व । वाउगे निमित्त बोलो नको।*
*माप टाकी सळ धरिली विठ्ठले । थापटोनी केले सावधान ।*
*प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी । उरले ते शेवटी लावी तुका । १३२०*

तुकोबांचे बहुतेक अभंग प्रासंगिक आहेत. परंतु ते कोणत्या प्रसंगी लिहिले आहेत त्याची आपणाला माहिती नाही. एकवेदांती मुकुंदराजकृत विवेकसिंधू याचे पारायण तुकोबांना ऐकावयाचा आग्रहच केला. गोधडी पांघरून तुकोबा बसले. काही हालचाल दिसेना. त्या ब्राह्मणाने गोधडी दूर करून पाहिले. तुकोबा कानात बोटे घालून रामकृष्ण हरी म्हणत बसले होते. त्याचे कारण ब्राह्मणांनी विचारले. तुकोबा म्हणाले - हा वेदान्त माझ्यासारख्या अडाण्याला काय कामाचा ? मनुष्य कितीही शहाणा झाला तरी सृष्टीची उत्पत्ती, स्थिती व लय करण्याचे परमेश्वराचे सामर्थ्य त्याला कसे प्राप्त होईल? माझ्यासारख्या अडाणी माणसाला मी भक्त आणि तू देव असा भावच ठीक आहे आणि या भावाचे रक्षण होण्यासाठी तुमच्या अद्वैत सिद्धांतापासून मी दूर राहतो.

*नको ब्रह्मज्ञान आत्मा स्थिती भाव । मी भक्त तू देव ऐसे करी । १०२२*
*पोटवीन लाळ ब्रह्मज्ञानाया हाती । मुक्ता आत्मस्थिति सांडवीन । १५८१*
*अद्वैती तो माझे नाही समाधान । गोड हे चरण सेवा तुझी करुनि उचित देई हेचि दान । आवडे कीर्तन नाम तुझे। ३७५४*

ज्ञान वा मोक्षमार्गापेक्षा तुकोबांना भक्तिमार्ग पसंत

होता. वैराग्य दोन प्रकारचे-आपत् -काळामुळे येणारे व दुसरे ईश्वरावर प्रेम जडले म्हणजे येणारे. रस वर्जं रसोप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते । विषय वासना आपोआप निमूट जातात, मन परमेश्वराच्या ठायी रममाण होते.

## तुकोबांची आवडी (पत्नी)

सुरुवातीला तुकोबांचे बायकोशी खटके उडत. पुढे ती मोठी शिष्याच झाली. परंतु तिचा कजागपणा लोकांच्या नजरेत तसाचं राहिला. दृष्टी बदलली नाही. जिजाई श्रीमंत सावकाराची मुलगी होती. लग्न मोठ्या थाटाने झाले होते. सासरची सांपत्तिक स्थिती चांगली होती. पुढे वाईट दिवस आले, ती डगमगली नाही. नवऱ्याला सोडून माहेरी राहिली नाही. तिने होईल तितकी नवऱ्याला मदत केली. तिने पैसे उभारून नवऱ्याच्या धंद्याला पैसे दिले. प्रोत्साहन दिले. अपयश येत गेले. हे अपयश नवऱ्याच्या अत्यंत कनवाळूपणामुळे येई. विठोबा तिचा देव नव्हता. जोखाई, माखाई ह्या होत्या. विठोबा हा घरघेणा देव आहे - अभाग्याच्या घरी पांडुरंग असतो असे ती म्हणे. जिजाबाईची विठोबाविषयी तेढ वाढत चालली. संसाराची राखरांगोळी करणाऱ्या विठोबाला सोडून द्या, ग्रहाची दाने करा, शनीचा जप करा, नवस करा. तुकोबांना हे आवडत नसे. विठोबाची भक्ती शुद्ध, इतर भक्ती धन मिळो, संकट दूर होवो. शत्रूचा नाश होवो म्हणून ती भक्ती क्षुद्र असे तुकोबांना वाटे.

*आणिकांच्या घाते । मानिला संतोष । सुख दुःख दोष अंगी लागे ।*

*ऐसे मती वाहू नये ती संकल्प । करू नये पाप भांडवल। ४१०४*

*अज्ञानाची भक्ती इच्छिति संपत्ति । तया चित्ते मति बोध कैंचा ।*

*अज्ञानाचे कर्म फळा ठेवी मन । निष्काम साधन तया कैंचे ।*

*अज्ञानाची पूजा कार्मिक भावना । तयाचिया ध्याना देव कैचा।*

*अज्ञानाचे कर्म फला ठेवी मन । निष्काम साधन तया कैचे ।*

*अज्ञानाचे ज्ञान विषयावरी ध्यान । ब्रह्म सनातन तया कैचे*

*तुका म्हणे नको ऐसि यांचे तोंडे । अज्ञानाचे बंड वाढविती । ४१०५*

कालांतराने तिची योग्यता वाढली. तुकोबांच्या पश्चात ती राहिली. ती मरण पावल्यावर तिचे देहूकरांनी देऊळ बांधले. बायकांनी संसार सांभाळायचा असतो. एकदम घराच्या भिंती पाडून विश्वाशी समरस होणे त्यांना कठीण जाते. सर्वांनाच साधु व संत समजण्याइतका भोळसटपणा संसारी स्त्रियांच्या ठायी टिकू शकत नाही. त्यांची दृष्टी भेदक असते. व्यवहारात भल्याबुऱ्यांची पारख करावी लागते. पण ही वृत्ती तुकारामांसारख्या भावनाप्रधान माणसाला आवडली नाही. आपण साधू म्हणून अंगिकारलेल्या माणसाच्या ठायी बायकोने दोष पाहणे हे त्यांना कसेसेच वाटे. दया, क्षमा वगैरे गुण जिजाईत होते. तरीसुद्धा खटके उडत, ही गोष्टी खरी आहे. पुढे तीही त्यांच्याशी समरस झाली. कजागपणा हा सुरुवातीचा, तो शेवटपर्यंत टिकला नाही. परंतु तिचे चित्र रंगवताना अनेकांनी कजाग बाईचेच चित्र रंगविले. तेवढीच गोष्ट आजच्या वाचकाना माहीत आहे.

## देवाची भक्ती -

एखादे मूल तहानभूक विसरते व खेळात घरही विसरते- तुकाराम म्हणतात -

*खेळता विसरे भूक तान घर धरुनिया कर आणि बळे*

*खेळता गुंतले उमजोनि आणि बैसोनिया स्तनी लावी बळे*

*रुसोनिया पळे सांडोनिया ताट । माझे पाहे वाट यावे ऐसी ।*

*कन्या सासुरासी जाये । मागे परतोनी पाहे । तैसे झाले माझ्या*

*जीवा । केव्हां भेटसी केशवा । २६६*

*माहेरीचा काय येईल निरोप म्हणूनी झोप नाही डोळा । ११४५*

*कासया एकांत सेवू तया वना । आनंद तो नामा माजी असे।*

*कासया उदास असो देहावरी । अमृत सागरी बुडोनिया।*

संतकृपा झाली इमारत फळा आली ह्या अभंगात बहिणाबाईने भागवत धर्माची इमारत ज्ञानदेवांपासून तुकारामांपर्यंत कशी पूर्णावस्थेत येत गेली, त्याचे सुरेख वर्णन केले आहे.

मंबाजीने काटेरी काठीने झोडपून काढले, पण तुकारामांची शांतता ढळली नाही. देवावरचा विश्वास दृढ होत गेला.

*काठीवरी मारविले । शिव्यागाळी नांव नाही । बहुफार विटंबिले । तुका म्हणे क्रोधा हाती । सोडवूनी घेतले रे।३५६*

तुकारामांनी शिष्य-संप्रदाय चालविला नाही.

*नाही शिष्य शाखा सांगो अयाचित लोका । नव्हे मठपति नाही चाहुयंचि वृत्ति ।*

*नाही देवार्चन असे मांडिले दुकान ।*

**अभंगांना जलसमाधी -**

वह्या कोणी वा कोणाच्या सांगण्यावरून बुडविण्यात आल्या, त्या माणसाचे नामनिर्देश तुकोबा करीत नाहीत. परंतु हे काम रामेश्वर भटाने केले. त्यामुळे त्याच्या अंगाचा दाह होऊ लागला. नंतर तो ज्ञानेश्वरांना शरण गेला. ज्ञानेश्वरांनी दृष्टांत दिला. तुकोबांना शरण जाण्यास सांगितले. ते तुकोबांना शरण गेले. मगच शरीराचा दाह कमी झाला.

*माझी मज आजी रोकडी प्रचीत । होऊनी फजीत दुःख पावे*

*काही द्वेष त्याचा करिता अंतरी । व्यथा या शरीरी बहुत झाली ।*

*ज्ञानेश्वर मज केला उपकार । स्वप्नी सविस्तर सांगितले*

*तुका सर्व श्रेष्ठ प्रिय आम्हा । थोर का जे अवतार नामयाचा*

*तोचि हा विश्वास धरूनी मानसी । जाय कीर्तनासी नित्यकाळ*

*म्हणे रामेश्वर त्याच्या समागमे । झाले हे आराम देह माझे । १०८१*

इंद्रायणीत बुडविलेल्या अभंगांच्या वह्या नदीच्या प्रवाहाबरोबर न जाता देवाच्या कृपेने रक्षल्या गेल्या. अभंग नाश करण्याचा दुहेरी हल्ला झाला. एक नष्ट करून टाकणे. दुसरे अपपाठ घुसडून विकृत करणे. असा वाङ्मयावर दोहो बाजूंनी हल्ला होतो.

*आम्ही काळाचेही काळ । विठोबाचे लडिवाळ । करू सत्ता सर्वाठायी । बसो निकटवास पायी ।*

*ऐसी कोणाची वैखरी । वदे आमुचे सामोरी । तुका म्हणे वाण । हाती हरिनाम तीक्ष्ण ।*

तुकोबारायांची गाथा ही श्री विठ्ठलरूपात श्री विष्णूची भक्ती करणाऱ्या सांप्रदायिक वारकऱ्यांचा वेद होय. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांचे ग्रंथ वारकरी संप्रदायाचे वेदचतुष्टय. ज्याप्रमाणे कल्पनातीत काळापासून वेदचतुष्टय मुखोद्गत करण्याचे ब्रीद राखून आपल्या वेदांचे ब्राह्मणांनी आजतागायत संरक्षण केले. त्याचप्रमाणे वारकरी पंथातील पट्टीच्या वारकऱ्यांनी हे वेदचतुष्टय मुखोद्गत करून सुरक्षित राखले.

(क्रमशः)

शं. वा. मठ
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

•••

ग्रंथविश्वात गीता

# विनोबाजींची 'गीता प्रवचने'

*गीतेवर निर्माण झालेले महान ग्रंथ हे भारतीय साहित्याचे वैभव आहे. या लेखनमालेतून अशा काही ग्रंथांची कल्पना श्रीमती भिडे देणार आहेत. - संपादक*

ज्ञानोबांपासून विनोबांपर्यंत आजवर अनेकांनी मराठीत गीतेवर विस्तृत लिखाण केले आहे. त्याआधी श्रीमद् शंकराचार्य, मध्वाचार्य, वामन पंडित, वल्लभाचार्य आदींनी संस्कृतातून गीतेवर भाष्य केले आहे. कारण 'गीता' हे मानवाला प्रेयसाकडून श्रेयसाकडे नेणारे असे श्रेष्ठ शास्त्र आहे. अर्जुनाने भगवंताला श्रेयसच (आत्मकल्याण) मागितले. गीता हे अध्यात्मशास्त्र आहे. यात आत्मविद्या व ब्रह्मविद्या सांगितली आहे. 'गीता' हे नुसते शब्द पांडित्याचे शास्त्र नाही तर गीता हे जीवनोपनिषद, संसार जिंकणारे शास्त्र आहे. गीतेची अक्षरे म्हणजे आत्म्याला प्रकट करणारे मंत्र आहेत. मानवाला आत्मोन्नतीकडे नेणारे गीतेसारखे दुसरे साधन नाही.

गीतेवर मराठीतून भाष्य करणाऱ्या अनेकांपैकी प्रथम आपण विनोबाजींच्या 'गीता प्रवचने' या ग्रंथाचा परिचय करून घेणार आहोत. माझ्या हाती १९८० ची आवृत्ती आहे. 'गीता प्रवचने'च्या अनेक आवृत्त्या निघाल्या. पण विनोबाजींनी ही प्रवचने १९३२ साली धुळ्याच्या जेलमध्ये सांगितली. (लो. टिळकांचे 'गीतारहस्य'ही मंडालेच्या तुरुंगातच लिहिले गेले आहे. ते आपण नंतर बघणार आहोतच.) ही प्रवचने सांगितली गेली त्यावेळी जेलमध्ये अनेक संत-महंत आणि सेवक गोळा झाले होते. त्यामुळे रोजच्या उपयोगाच्या गोष्टींची यात चर्चा आहे. जीवनाशी संबंधित नसलेले कोणतेही वैचारिक वाद यात आलेले नाहीत. साने गुरुजींसारखा सिद्धहस्त सत्पुरुष ही प्रवचने टिपून घ्यायला लाभला, ही त्याचीच कृपा होय, असे विनोबाजी म्हणतात.

'गीता प्रवचने' भारतीय जनतेचे पुस्तक झाले आहे. भूदान यज्ञाचे वातावरण निर्माण करण्याच्या कामी त्याचा उपयोग होत असल्यामुळे त्याच्या प्रती गावोगाव आणि घरोघर पोहोचल्या आहेत. गीतेप्रमाणे ही प्रवचनेही प्रत्यक्ष कर्मक्षेत्रात प्रकट झाली आहेत. विनोबाजींना असा विश्वास आहे की, खेड्यात किंवा शहरात सामान्य मजुरी करून जगणाऱ्या श्रमिकांनाही यातून सांत्वना आणि श्रमपरिहार लाभेल.

या प्रवचनांच्या निमित्ताने गीतेची सेवा करण्याची विशेष संधी देवाने मला दिली, ही मी त्याची मोठी कृपाच समजतो. विनोबाजी पुढे म्हणतात, 'हिंदुस्थानभर जिथे जिथे ही प्रवचने पोहोचली आहेत तिथे तिथे हृदयशुद्धीची आणि क्रिया पालटण्याची त्यांनी प्रेरणा दिली आहे. माझी इच्छा आहे की घरा-घरांत त्याचे श्रवण-पठण-मनन व्हावे.

ते म्हणतात, गीतेचा व माझा संबंध तर्कापलीकडचा आहे. माझे शरीर आईच्या दुधावर पोसले, त्यापेक्षाही माझे हृदय व बुद्धी यांचे गीतेच्या दुधावर अधिक पोषण झाले आहे. जेथे जिव्हाळ्याचा संबंध असतो तेथे तर्कास वाव नसतो. तर्काला छाटून श्रद्धा व प्रयोग या दोन पंखांनीच गीतेच्या गगनात मी यथाशक्ती भराऱ्या मारीत असतो. मी प्राय: गीतेच्याच वातावरणात असतो. गीता म्हणजे माझे प्राणतत्त्व. मी गीतेविषयी इतरांशी कधी बोलतो तेव्हा गीतेच्या समुद्रावर तरंगत असतो आणि एकटा असतो त्यावेळेस त्या अमृतसमुद्रात खोल बुडी मारून बसतो. अशा या गीतामाऊलीचे चरित्र दर रविवारी त्यांनी जेलमध्ये सांगितले. विनोबाजी व लो. टिळक या दोघाही राष्ट्रपुरुषांना कारावास भोगावा लागला. पण त्या कालावधीत खडतर आयुष्य जगतानासुद्धा त्यांच्याहातून 'गीता प्रवचने' व

'गीतारहस्या'सारखे महान ग्रंथ निर्माण झाले. त्यांच्याहातून गीताभाष्याच्या रूपाने देशसेवा, देशकार्यच घडले आहे. या दोन्ही ग्रंथांना तोड नाही.

'गीता प्रवचने'ची अनुक्रमणिकाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. नुसती अनुक्रमणिका वाचली तरी गीतेच्या अठरा अध्यायात काय सांगितले आहे याचा नेमका, पण थोडक्यात परिचय होऊ शकेल. गीतेच्या अध्यायाचीच नावे अनुक्रमणिकेत न देता विनोबाजींनी त्यांना उपयोगी वाटली ती यथायोग्य नावे अध्यायांना दिली आहेत. उदा. अध्याय ६ - चित्तवृत्ती निरोध. त्यात आत्मोद्धाराची आकांक्षा, चित्ताची एकाग्रता, एकाग्रता कशी साधावी, जीवनातील परिमितता, मंगल दृष्टी, बालक-गुरू, अभ्यास-वैराग्य आणि श्रद्धा असे उपविभागही (महत्त्वाचे विषयांचे मुद्दे) दिले आहेत.

विनोबाजी म्हणतात, 'महाभारत' व 'रामायण' हे आमचे राष्ट्रीय ग्रंथ. त्यातील राम, सीता, धर्म, अर्जुन, द्रौपदी, भीष्म, हनुमान इ. व्यक्ती आमच्या जीवनाशी एकरूप झाल्या आहेत. आज हजारो वर्षे त्यांनी भारताचे जीवन भारून टाकले आहे. जगातील इतर महाकाव्यांतील पात्रे अशी लोकजीवनात मिसळून गेलेली दिसत नाहीत. त्यादृष्टीने हे दोन ग्रंथ नि:संशय अद्‌भुत ग्रंथ आहेत . रामायण हे मधुर नीतिकाव्य आहे, तर महाभारत हे व्यापक समाजशास्त्र आहे. व्यासांनी १ लक्ष संहिता लिहून असंख्य चित्रे, चरित्रे व चारित्र्ये मोठ्या कौशल्याने यात यथावत रेखाटली आहेत.

केवळ निर्दोष एका परमेश्वराशिवाय कोणीही नाही. पण तसेच या जगात केवळ दोषपूर्ण असेही काही नाही. ही गोष्ट महाभारत स्पष्टपणे सांगते. भीष्म, युधिष्ठिर अशा सारख्यांचे येथे दोष दाखवले आहेत. उलट कर्ण व दुर्योधनादिकांचे गुण प्रकट केले आहेत. मानवी जीवन हे पांढऱ्या काळ्या तंतूंचा पट आहे, ही गोष्ट महाभारत सांगत आहे. (आधुनिक वाल्मिकी, कवी ग.दि.माडगूळकर यांनीही यावर सुंदर गीत लिहिले आहे. 'एक धागा सुखाचा, शंभर धागे दु:खाचे । जरतारी हे वस्त्र माणसा तुझिया आयुष्याचे ।') अलिप्त राहून भगवान व्यास जगातील विराट संसाराचे छाया प्रकाशमय चित्र दाखवीत आहेत. व्यासांच्या या अलिप्त व उदात्त प्रतिभेमुळे महाभारत हा ग्रंथ म्हणजे एक सोन्याची प्रचंड खाण बनला आहे. शोधन करून भरपूर सोने लुटून न्यावे. एवढे मोठे महाभारत त्यांनी लिहिले, पण स्वत:चे असे काही व्यासांना त्यात सांगावयाचे होते की नाही? काही विशिष्ट संदेश त्यांनी कुठे सांगितला आहे का? कोणत्या ठिकाणी त्यांची समाधी लागली आहे? ठिकठिकाणी अनेक तत्त्वज्ञानाची आणि उपदेशांची जंगलेच्या जंगले महाभारतात आली आहेत. पण या सर्वांचे आणि एकंदर ग्रंथाचे सारभूत रहस्य त्यांनी कोठे मांडले आहे का? विनोबाजी म्हणतात, 'होय. समग्र महाभारताचे नवनीत व्यासांनी भगवद्‌गीतेत दिले आहे. गीता ही व्यासांची मुख्य शिकवण आहे आणि त्यांच्या मननाची संपूर्ण साठवण आहे. हिच्याच आधारे 'मुनीत मुनी मी व्यास' ही विभूती सार्थ ठरावयाची आहे. प्राचीन काळापासून गीतेला उपनिषद ही पदवी मिळाली आहे. गीता उपनिषदांचेही उपनिषद आहे. कारण सर्व उपनिषदांचे दोहन करून हे गीतारूपी दूध भगवंतांनी अर्जुनाच्या निमित्ताने सर्व जगताला प्यावयास दिले आहे.

जीवनाच्या विकासाला आवश्यक असलेला प्राय: प्रत्येक विचार गीतेत येऊन गेला आहे. म्हणूनच गीता धर्मज्ञानाचा कोष आहे. गीता हा लहानसाच, पण हिंदू धर्माचा मुख्य ग्रंथ आहे. गीता महाभारताच्या मध्यभागी सर्व महाभारतावर प्रकाश पाडीत उंच दीपाप्रमाणे उभी आहे. एकीकडे सहा पर्वे, दुसरीकडे बारा पर्वे अशा मध्यभागी, तसेच एकीकडे सात अक्षौहिणी व दुसरीकडे अकरा अक्षौहिणी सैन्य अशाही मध्यभागी गीता उपदेशिली गेली आहे.

गीता सांगणारा कृष्ण, ते ऐकणारा भक्त अर्जुनही त्या शिकवणीशी इतका समरस झाला की तोही कृष्णमय होऊन गेला म्हणून त्यालाही 'कृष्ण' ही संज्ञा प्राप्त झाली. देवा-भक्तांचे हे हृद्गत प्रकट करीत असता व्यासदेव इतके विरघळून गेले की त्यांनाही लोक कृष्ण याच नावाने ओळखू लागले. सांगणारा, ऐकणारा, रचणारा कृष्ण असे तिघात जणू अद्वैत उत्पन्न झाले. तिघांची जणू समाधी लागली. गीतेच्या अभ्यासकाला अशीच एकाग्रता पाहिजे हे त्यात महत्त्वाचे म्हणून विनोबाजींना सांगायचे आहे.

गीतेचा आरंभ म्हणजे तत्त्वज्ञानाचा आरंभ दुसऱ्या अध्यायातील अकराव्या श्लोकापासून झाला आहे म्हणून तेथूनच आरंभ समजायला काय हरकत आहे असे कित्येकांना वाटते. अक्षरांत 'अकार' ही ईश्वरी विभूती भगवंतांनी सांगितली आहे. 'अशोच्यानन्वशोचस्त्वय:'च्या आरंभी आयताच अकारही आहे. तेव्हा तिथूनच प्रारंभ धरावा. ही कोटी सोडून दिली तरी तो आरंभ अनेक प्रकारे योग्य आहे यात शंका नाही. तरी पण तत्पूर्वीच्या प्रास्ताविक भागाचेही महत्त्व आहेच. ज्ञानेश्वरांनीही पहिल्या अध्यायाला गीतेचे प्रयोजन म्हटले आहे. तो लक्षात घेतल्याशिवाय पुढचा कथाभाग कसा लक्षात येईल? विनोबाजींचे म्हणणे अगदी योग्यच आहे. अर्जुनाचे क्लैब्य दूर करणे इतकेच गीतेचे तात्पर्य नाही. तसेच अर्जुनाची अहिंसावृत्ती दूर करून त्याला युद्धप्रवृत्त करणे यासाठी गीता सांगितली हेही म्हणणे बरोबर नाही. यासाठी आपणाला अर्जुनाची भूमिका तपासली पाहिजे. या कामी पहिला अध्याय आणि त्याचे दुसऱ्या अध्यायात शिरलेले आखात फार उपयोगी आहे. अर्जुनाच्या ठिकाणी अशोकाप्रमाणे अहिंसावृत्तीचा उदय झाला होता का? तर नाही. ही सारी स्वजनासक्ती होती. या घटकेला जर समोर आप्तस्वकीय नसते तर त्याने शत्रूंची मुंडकी चेंडूप्रमाणे उडवली असती. पण आसक्तीजन्य मोहाने त्याची कर्तव्यनिष्ठा ग्रासली आणि मग त्याला तत्त्वज्ञान आठवले. विनोबाजी म्हणतात, कर्तव्यनिष्ठ मनुष्य मोहग्रस्त झाला तरी नागडी कर्तव्यच्युती त्याला सहन होत नाही. तो तिला एखादा सद्विचार नेसवतो. अर्जुनाचे तसेच झाले. तो आता युद्धच मुळात पाप आहे असे उसने प्रतिपादन करू लागला. विनोबाजी यासाठी न्यायाधिशाचे सुंदर उदाहरण देतात. न्यायाधीश स्वत:च्या मुलाला फाशीची शिक्षा सुनावणार नाही. त्यावेळी हे अमानुष कृत्य आहे, मानवतेला न शोभणारे आहे. वगैरे वगैरे मुद्दे तो मांडू लागेल. पण इतरांना मात्र तो मरेपर्यंत फाशीची शिक्षा ठोठावतो. अर्जुनाची अवस्था न्यायाधीशासारखीच झाली होती. त्याने मांडलेले मुद्दे चुकीचे नव्हते. गेल्या महायुद्धाचे परिणाम जगाने पाहिले होते. अर्जुनाचे ते तत्त्वज्ञान नव्हते. विनोबाजी म्हणतात, तो त्याचा प्रज्ञावाद होता. हे कृष्ण सर्व जाणून होता. म्हणून त्याच्या मुद्यांची मुळीच दखल न घेता त्याने मोहनाशाचा उपाय अवलंबिला. अर्जुन जर खरोखरच अहिंसावादी झाला असता तर अवांतर ज्ञान विज्ञान कोणीही कितीही सांगितले असते तरी मूळ मुद्याचे उत्तर मिळाल्याशिवाय त्याचे समाधान झाले नसते. पण सबंध गीतेत या मुद्याचे उत्तर नाही आणि तरीही अर्जुनाचे समाधान झालेले आहे. याबरून त्याची अहिंसावादी वृत्ती नव्हती. तो युद्धप्रवृत्तच होता. पण आता - तो मोहाने ते टाळू पहात होता आणि मोहावरच गीतेची गदा आहे. विनोबाजी म्हणतात, स्वधर्म विरोधी मोहाचा निरास हेच गीतेचे प्रयोजन आहे.

अर्जुन आता अहिंसेची काय संन्यासाचीही भाषा बोलू लागला होता. विनोबाजी म्हणतात, त्याला संन्याशाचा वेश सहज घेता आला असता, पण संन्याशाची वृत्ती कशी घेता आली असती ! तो संन्याशाच्या नावाने रानात गेला असता तरी तिथे हरिणे मारू लागला असता. म्हणून भगवंत त्याला स्पष्टच म्हणाले, अरे लढाई करणार नाही म्हणतोस हा तुझा भ्रम आहे. तुझी क्षात्रवृत्ती तुला लढायला लावल्याशिवाय राहणार नाही. विनोबाजी म्हणतात, अर्जुन संन्यासी होऊ शकला नसता व गौतम बुद्ध राजा होऊ शकला नसता. प्रत्येकाने आपला स्वधर्म पाळावा.

इथे विनोबाजी एक मुद्दा उपस्थित करतात की, संन्यास जर युद्ध करण्याच्या धर्माहून केव्हाही श्रेष्ठ आहे तर भगवंतांनी अर्जुनाला खरा संन्यासी का बनवले नाही? त्यांना काय ते अशक्य होते? पण मग त्यात त्याचा पुरुषार्थ काय राहिला असता ! गीतेचा जन्म स्वधर्माच्या आड येणाऱ्या मोह निवारणार्थ आहे. स्वधर्माच्या बाबतीत त्याला मोह पडला हे श्रीकृष्णाने दिलेल्या पहिल्या ठपक्यानंतर अर्जुन स्वत:च कबूल करीत आहे. गीतेच्या अखेरीला भगवंतांनी प्रश्न केला, 'अर्जुना, गेला मोह?' अर्जुन म्हणाला, 'देवा, मोह गेला, स्वधर्माचे भान आले.' विनोबाजी म्हणतात, अशाप्रकारे जर गीतेचा उपक्रम व उपसंहार जुळवून पाहिला तर मोहनिराकरण हेच फलित निघते. गीतेचेच नव्हे तर महाभारताचेही हेच उद्दिष्ट आहे. व्यासांनीही महाभारताच्या प्रारंभी हेच म्हटले आहे.

अर्जुन म्हणजेच ऋजू मनाचा, तो आधीच कृष्णशरण होता. कृष्णाला सारथी बनवून आपल्या घोड्याचे लगाम त्याने त्याच्या हातात दिले. त्याचवेळी त्याने आपल्या मनोवृत्तीचेही लगाम त्याच्या हातात सोपविण्याची तयारी ठेवली होती. विनोबाजी म्हणतात, आपणही असेच करूया. कृष्ण ही कोणी व्यक्ती नाही. प्रत्येकाच्या हृदयात अंतर्यामीरूपाने तो विराजमान आहेच. आपण त्याला शरण गेल्यास तो आपलेही सारथ्य करील व आपल्या श्रीमुखाने तो आपल्याला गीता ऐकवील आणि विजयलाभ करून देईल.

पुंडलिकासाठी पंढरीच्या पांडुरंगाचा अवतार झाला असे नाही तर पुंडलिकाच्या निमित्ताने साऱ्या जडजीवांच्या उद्धारासाठी झाला आहे तसेच गीता अर्जुनाच्या निमित्ताने आपणा सर्वांसाठी आहे असे विनोबाजी सांगतात. म्हणून पहिल्या अध्यायाला 'अर्जुन विषाद योग' न म्हणता 'विषाद योग' म्हणतात. गीतेला अर्जुन निमित्तमात्र आहे.

'गीता प्रवचने' मध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे अनेक अध्यायांची सुरुवात प्रिय बंधूनो ! अशी श्रोत्यांना संबोधून केली आहे. ज्ञानोबांप्रमाणे विनोबांसमोरही श्रोतृगण बसलेला आहे. त्यामुळे त्यांच्या प्रवचनात ज्ञानेश्वरांप्रमाणेच श्रोतृसंवाद आढळतो. नवव्या अध्यायाच्या सुरुवातीला ते श्रोत्यांना म्हणतात. माझा घसा दुखत आहे. माझा आवाज ऐकू येईल की नाही याविषयी जरा शंका वाटते. त्यावेळी ते थोरले माधवराव पेशवे अंतकाळी जसे वैद्यास म्हणाले, माझ्या कफाचे पर्यवसान अतिसारात करा म्हणजे रामनाम घेण्यास माझा घसा मोकळा होईल. तसे देवास म्हणाले. देव म्हणाला, 'जसा घसा चालेल तसा बोल.' विनोबाजी विनम्रपणे श्रोत्यांना म्हणतात, 'मी जी येथे गीता सांगत आहे ती कोणास उपदेश करावा या हेतूने नाही. लाभ करून घेणाऱ्यास त्यापासून लाभ अवश्य होईल. परंतु मी गीता सांगत आहे ती रामनाम म्हणून सांगत आहे. गीता सांगताना माझी हरिनामाची भावना असते. मी जे हे सांगत आहे त्याचा नवव्या अध्यायाशी संबंध आहे. हरिनामाची अपूर्व थोरवी या नवव्या अध्यात सांगितली आहे. हा अध्याय जपत ज्ञानदेव समाधिस्थ झाले असे म्हणतात. या अध्यायाच्या स्मरणाने माझे डोळे भरून येतात. हृदय उचंबळते. व्यासांचा भरतखंडावरच नव्हे तर सर्व मानवजातीवर केवढा हा उपकार ! जी वस्तू भगवंतांनी अर्जुनास सांगितली ती अपूर्व वस्तू शब्दांनी सांगण्यासारखी नव्हती. पण दयेने प्रेरित होऊन व्यासांनी ती वस्तू संस्कृत भाषेत प्रकट केली. गुह्य वस्तूला वाणीचे रूप दिले. ही जी राजविद्या ती अनुभवायची गोष्ट आहे. भगवान तिला 'प्रत्यक्षावगम' म्हणतात. शब्दात न मावणारी प्रत्यक्ष अनुभवाच्या कसावर कसलेली अशी गोष्ट या अध्यायात सांगितली असल्यामुळे त्यास फार गोडी आली आहे.'

या नवव्या अध्यायाचे उदाहरण मी विनोबाजींचा श्रोतृसंवाद दाखवण्यासाठी म्हणून दिले आहे. प्रत्येक अध्यायातच तो अभ्यासकांना आढळून येईल. मूळ गीता

ही कृष्णार्जुनाचा संवादच आहे. त्यामुळे 'गीता प्रवचने' मधील विनोबाजींचे श्रोतृसंवादही वाचकांची व गीतेची जवळीक साधतील. या अध्यायाचे शीर्षक 'मानवसेवेची राजविद्या: समर्पणयोग' असे आहे. त्यात 'प्रत्यक्ष अनुभवाची विद्या', 'सोपा मार्ग', 'अधिकार-भेदाची भानगड नाही' 'कर्मफल देवाला अर्पण', 'विशिष्ट क्रियेचा आग्रह नाही' 'सारे जीवन हरिमय होऊ शकते', 'पापाचे भय नाही', 'थोडेही गोड' असे महत्त्वाचे मुद्दे मांडून त्याचे विश्लेषण व विवेचन केले आहे. अध्यायाचा सारांशही दिला आहे. प्रत्येक अध्यायाच्या प्रवचनाची तारीखही खाली दिलेली आहे. श्रोतृसंवादाचे सुंदर उदाहरण दखवण्यासाठी मी एकदम ९ व्या अध्यायावर उडी मारली.

दुसऱ्या अध्यायात विनोबाजी सांख्य -बुद्धी याचा अर्थ जीवनाचे मूलभूत सिद्धांत असा मी करीत आहे असे सांगतात. गीतेला जुने शास्त्रीय शब्द नवीन अर्थाने वापरण्याची सवय आहे. जुन्या शब्दांवर नवीन अर्थाचे कलम करणे ही विचारक्रान्तीची अहिंसक प्रक्रिया आहे. व्यासांचा ह्या प्रकियेत हातखंडा आहेत त्यामुळे गीतेतील शब्दांना व्यापक सामर्थ्य येऊन गीता ताजी, टवटवीत राहिली आणि अनेक विचारकांना त्यांच्या त्यांच्या गरजेप्रमाणे आणि अनुभवाप्रमाणे अनेक अर्थ घेता आले. हे सर्व अर्थ त्या त्या भूमिकेवरून योग्य असू शकतात आणि त्यांचा विरोध करण्याची गरज न पडता आपण स्वतंत्र अर्थ करू शकतो असा माझा दृष्टिकोन आहे, असे विनोबाजी स्पष्ट करतात.

तिसऱ्या अध्यायात विनोबाजी म्हणतात, 'ज्याची दृष्टी स्थूल त्याला फळही स्थूल. परंतु खरा कर्मयोगी परमेश्वर दर्शनाचे फळ मागतो. स्थूल मापाने तो आपले कर्म मोजीत नाही. कर्मात खोली (उत्कृष्टता) व ओली (ईश्वरार्पणतेची) असावी. कर्मयोगी खोल कर्म करून ईश्वरार्पण करतो.

चौथ्यात केवळ तेलवातीने दिवा लागत नाही, तेथे ज्योतीची गरज असते. तद्वत केवळ स्वधर्माचरणाने निष्कामता येणार नाही. त्यासाठी कर्माला विकर्माची जोड हवी. ते म्हणतात बाहेरून नमस्कार केला तरी मनाने नमले पाहिजे. शरीराने उपास केला तरी मनात परमेश्वराचे चिंतन-स्मरण हवे. अंतर्बाह्य एक झाले पाहिजे. (विकर्म म्हणजे कर्मात चित्त ओतणे, मनापासून कर्म करणे हा विनोबांनी लावलेला विकर्माचा अर्थ बरोबर नाही असे 'गीतासागर' मध्ये विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकरांनी साधार दाखवून दिले आहे. त्यांचे पुस्तक पाहू तेव्हा त्यांनी लावलेला विकर्माचा अर्थ पाहू.) वस्तूचा मोबदला म्हणून आपण दुकानदाराला पैसे देतो, पण दक्षिणा देताना मोबदल्याची अपेक्षा नसते. दक्षिणा देण्यामागे भावना असते. म्हणून दक्षिणा भिजवून देतात. त्यामागे भावनेचा ओलावा असतो. दक्षिणा किती दिली याला महत्त्व नाही. त्यामागच्या भावनेला महत्त्व. भगवंताला तुलसीपत्र जरी भक्तिभावाने वाहिले तर त्याला ब्रह्मांडाचे महत्त्व प्राप्त होते. ही दोन्ही उदाहरणे विकर्माची म्हणून विनोबाजींनी दिली आहेत. कर्माबरोबर विकर्म आले की निष्कामतेची ज्योत पेटेल. शरीर, मन या दोन वस्तू म्हणून साधनेही दोन हवीत. शरीराने तप व मनाने जप करावा.

पाचव्यात दुहेरी अकर्मावस्था, योग आणि संन्यास सांगितला आहे. संन्यासाच्या दोन तऱ्हांची तुलना इथे केली आहे. १) चोवीस तास कर्म करूनही काहीच करत नाही. २) कर्म न करूनही सर्व करतो. विनोबाजी म्हणतात केवढी उदात्त, रसमय, काव्यमय कल्पना ही ! आणखी काव्य ते काय राहिले ? या काव्यात जी दिव्यता आहे ती कोठल्याही काव्यात नाही.

सहाव्या अध्यायात ध्यानयोगात तीन गोष्टी सांगितल्या आहेत.

१) चित्ताची एकाग्रता २) जीवनाची परिमितता ३) समदृष्टी अभ्यास व वैराग्य ही या तीन साधनांची साधने

आहेत. सहाव्या अध्यायापासून विकर्माचे प्रकार सांगितले आहेत. मानसिक साधना सांगितली आहे. त्या अगोदर 'बा जोवा तू देव होऊ शकशील. ही दिव्य आकांक्षा बाळग. मन मोकळे राखून पंख खंबीर ठेव' असे गीता सांगत आहे.

लो. टिळकांनी 'गीतारहस्या'त सांगितले की, गीता हा ग्रंथ केवळ साधूंसाठी नसून सर्वसामान्यांसाठी, तमाम दुनियेसाठी आहे. टिळकांची ही भूमिका मी अक्षरश: खरी मानतो. गीता तुमचा हात धरून शेवटच्या मुक्कामावर घेऊन जाईल. ती प्रसिद्ध म्हण आहे ना 'पर्वत जर महंमदाकडे येत नसेल तर महंमद पर्वताकडे जाईल.' जड पर्वतालाही आपला संदेश कळावा म्हणून महंमद पर्वत येण्याची वाट पाहत बसणार नाही. हीच गोष्ट गीता ग्रंथाची. गरीब, दीनदुबळ्या, अडाण्याकडे गीता जाईल. ती त्याला तेथे कायम करावा म्हणून नाही; तर त्याचा हात धरून पुढे नेण्यासाठी. विनोबाजी म्हणतात, चंडोल पक्षी रोज सूर्य पाहून म्हणतो की मी उड्डाण करून सूर्याला गाठीन. अशी हिंमत, आकांक्षा, जिद्द बाळगा.

सातव्यात परमेश्वर समजून घेण्याचे एक महान साधन, थोर विकर्म सांगण्यासाठी भक्तीचे भव्य दालन या सातव्या अध्यायात उघडले आहे. चित्तशुद्धीसाठी यज्ञ, दान, तप, ध्यान, धारणा इ. साधनांना मी सोडा, साबण, रिठे यांची उपमा देतो. पण भक्तीच्या पाण्याशिवाय या सर्वांचा उपयोग काय? नुसते पाणी निर्मळता देऊ शकते, पण यांचाही सहयोग असेल तर दुधात साखर. यज्ञ-दान-तप-ध्यान यात जिव्हाळा, भक्ती हवी.

अध्याय ८ वा मला आठवा. जो विचार मरणसमयी मनात येईल तो पुढील जन्मास कारण होतो. या जन्माचा अंत पुढील जन्माची सुरवात. म्हणून मरणकाली माझे स्मरण कर तर मुक्त होशील. भगवंत म्हणतात. पण नेहमी मुखात हरिनाम नसेल तर शेवटी येईल का? म्हणून शेवटचा क्षण साधण्याचा आटापिटा न करता संपूर्ण जीवनच हरीमय असावे. विनोबाजी म्हणतात मरणाचे स्मरण नित्य ठेवावे. मरणाचा वाघोबा जर सदैव समोर असेल तर पापाचा विचार करायला वेळच मिळणार नाही. परमेश्वरावर श्रद्धा ठेवून काया वाचा मने जीवनाशी झगडत राहाल तर अंतिम घडी उत्तम येईल.

नववा अध्याय हा राजविद्येचा. यात कर्मयोग व भक्तियोगाचा सुंदर मिलाफ आहे. भक्तियोग - ईश्वराशी जोडणे. राजयोग = कर्म +भक्ती कर्म करायचे. फळ टाकायचे नाही ते देवाला द्यायचे. विनोबाजी म्हणतात, कर्मयोगात तोडलेले फळ राजयोगात जोडले जाते. ईश्वराला अर्पण केलेले कर्म पेरले जाते. पेरलेले अनंतपटीने मिळते. फेकलेले फुकट जाते. कर्म पेरण्याने जीवनात अपार आनंद भरेल, पावित्र्य येईल.

दहावा विभूती योगाचा. परमेश्वर सर्वत्र आहेच. सृष्टीत नाना रूपांनी नटलाय. नद्या, पर्वत, सागर, सिंह, गज, गाय, घोडा या प्राण्यांत, चंद्र, सूर्य, तारका सर्वांच्या रूपाने तो प्रकट झालाय. डोळ्यांना ते पाहण्याची सवय लावा. प्रथम ठळक व सरळ अक्षरे मग बारीक व जोडाक्षरे. जोडाक्षरे शिकेपर्यंत प्रगती नाही. दुर्जनांतही मग परमेश्वर पहा. राम पटतो तसा रावणही पटला पाहिजे. ठग, चोर, दुष्ट सारेच ब्रह्म आहेत.

अकरावा विश्वरूप दर्शनाचा अध्याय. विश्वातील अनंत वस्तूंतला परमात्मा कसा पहावा, 'आधी ठळक मग बारीक. आधी सरळ मग मिसळ.' अहर्निश अभ्यास करून सर्व विश्व आत्मरूप पहावयास शिकायचे. हे दहाव्यात पाहिले. अर्जुन भगवंताचा इतका लाडका की पांडवात मी धनंजय असे भगवंत म्हणतात. यापेक्षा प्रेमाचा पागलपणा, प्रेमवेडेपणा कुठे असेल? या अपार प्रीतीसाठी हा अध्याय प्रसादरूप आहे. दिव्यरूप पाहण्याची अर्जुनाची हौस त्याला दिव्यदृष्टी देऊन, भगवंतांनी पुरी केली. अर्जुनाला प्रेमाचा प्रसाद दिला त्यांनी. त्या दिव्यरूपाचे सुंदर, भव्य वर्णन या

अध्यायात आहे. पण अर्जुनाला विश्वरूपापेक्षा भगवंताचे सगुण साजिरे गोजिरे रूपच आवडते. जो परमेश्वर विराट रूपात भरलाय तसाच तो संपूर्ण लहानशा मूर्तीत, मातीच्या कणात, सिंधूच्या जलबिंदूतही आहे. एनलार्जमेंट फोटो व पासपोर्ट फोटो एकच. पासपोर्ट फोटो हा एनलार्जमेंटचा तुकडा नव्हे. विराट रूप व सगुण साकार रूप तसेच आहे.

जग जसे आहे तसेच मंगल आहे. विराट स्वरूप पाहण्याची इच्छा करू नका. ते दिव्य, दाहक, विलय करणारे आहे. विनोबाजी म्हणतात, गुरूला वंदन करून दूर बसा. आईच्या मांडीवर बसा. स्थलकालात्मक जग एकेठिकाणी आणण्याची जरुरी नाही. त्या विश्वरूप वर्णनाचे ते पवित्र श्लोक वाचावेत व पवित्र व्हावे. त्या परमेश्वराच्या दिव्य रूपाचे ते वर्णन आहे. तेथे बुद्धी चालविण्याची माझी इच्छा नाही. ते पाप आहे.

अध्याय ६ ते ११ एकाग्रतेपासून समग्रता दाखवली आहे. भगवंतांनी बाराव्या अध्यायात भक्तीचे माहात्म्य गायिले आहे. गंगा सर्वत्रच पवित्र; परंतु हरिद्वार, काशी, प्रयाग अशी पवित्र तीर्थक्षेत्रे अधिक पवित्र. भगवद्गीता तशीच पवित्र, पण काही अध्याय तीर्थक्षेत्र झाले आहेत. नवव्या अध्यायाला प्रयागमाधव असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. हा बारावा अध्याय अमृतधार आहे असे भगवंतांनीच म्हटले आहे. विनोबाजी म्हणतात की, भक्तीच्या वेलीला ज्ञानाची फुले आली पाहिजेत. लक्ष्मण, उद्धव हे सगुण भक्त व भरत, अर्जुन निर्गुण भक्त. सगुण भक्ती ही निर्गुण भक्तीपेक्षा सुलभ, सुरक्षित. पण सगुणाला निर्गुणात जावे लागते व निर्गुणाला सगुणात यावे लागते.

तेराव्यात तत्त्वमसि- तू देह नाहीस आत्मा आहेस. हे सांगितलेय. विनोबाजी म्हणतात, यातील स्वारस्य जेव्हा कळेल त्यावेळेस खरे शिक्षण, खरा विकास यांची सुरुवात होईल. सर्व ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये विचारपूर्वक कर्म करीत आहेत असे झाले पाहिजे. आत्मा देहापासून अलग करावा हे शिक्षण बालपणापासून देण्याची जर योजना करण्यात आली तर फार आनंदाची गोष्ट होणार आहे. देहाचे देव्हारे माजवले जात आहेत. आत्म्याच्या गोडीकडे कोणाचे लक्षच नाही. उत्तरोत्तर विकास करून घेत आत्म्यापासून देह अलग करीत सर्वांनी सारे जीवन परमेश्वरमय करण्याचा प्रयत्न करावा, असे विनोबाजी सर्वांना कळकळीने सांगतात.

आत्मा स्वयंपूर्ण आहे. त्याची गती ऊर्ध्व आहे, त्याला काही करून घ्यायचे आहे असे नाही. परंतु एखाद्या लहान वस्तूला जड वजन लावले की ती जशी खाली खेचली जाते.(फुग्याला नाही का मांजराचा आकार देऊन त्याला पुठ्ठ्याचा तुकडा लावतात मग ते खाली बसते) त्याप्रमाणे देहाचे ओझे आत्म्याला खाली खेचते. आत्म्याला देहापासून अलग करणे ही गोष्ट कठीण असली तरी त्याचे फळही मोठे आहे. म्हणून आत्म्याच्या पायातली देहाची बेडी तोडू शकलो तर फार आनंद प्राप्त होईल. स्वरूपानंद. मग देहदु:खाने तो दु:खी होणार नाही. ही देहरूपी वस्तू जिंकून घेतली तर मनुष्यावर कोण सत्ता चालवणार ! जो स्वत:वर राज्य करतो तो विश्वाचा सम्राट होतो. भगवान येशू ख्रिस्ताने त्यांना खिळे ठोकणाऱ्यांना क्षमा केली. देहाचे दु:ख त्यांना झाले नाही. कारण त्यांनी आत्म्याला देहापासून अलग केले होते. निग्रहाची दिशा या चौदाव्या अध्यायात दाखवली आहे. वल्ही होडी वल्हवतात, पण दिशा सुकाणू दाखवते. म्हणून दोन्ही गोष्टी हव्यात. तसेच देहाच्या सुखदु:खांपासून आत्म्याला अलग करण्याच्या कामी विवेक व निग्रह दोहोंची जरुरी आहे.

वैद्य प्रकृती तपासून उपचार सांगतो. त्याप्रमाणे या चौदाव्या अध्यायात भगवंतांनी तमाम प्रकृती तपासून पृथक्करण करून कोणते रोग जडले आहेत हे सांगितलेय असे विनोबाजी म्हणतात. सर्व चराचर प्रकृतीत तीन वस्तू आहेत. ज्याप्रमाणे आयुर्वेदात कफ-पित्त व वात. त्याप्रमाणे इकडे सत्त्व-रज-तम हे तीन गुण प्रकृतीत भरून राहिले

आहेत. या त्रिगुणांना जिंकले की देहापासून आत्मा अलग होऊ शकेल. त्याची युक्तीही या अध्यायात भगवंतांनी सांगितली आहेच.

पंधराव्यात भक्तिमार्ग प्रयत्नमार्गाहून निराळा नाही ही गोष्ट सुचविण्यासाठी या अध्यायाच्या प्रारंभीच संसाराला एका महान अश्वत्थ वृक्षाची उपमा दिली आहे. रज, तम मारायचे, सत्त्वाचे पोषण करायचे. विनोबाजी म्हणतात, एक विनाशक तर दुसरे विधायक काम. गवत काढणे, बी पेरणे ही एकाच क्रियेची दोन अंगे. तसेच हे दोन्ही मिळून एकच मार्ग.

रामायणात रावण, कुंभकर्ण व बिभीषण हे तिघे भाऊ आहेत. म्हणजेच यात रजो-तमोचा नाश व सत्त्व गुणाचा विकास करायचा. पवित्र व्हायचे. आसक्ती जिंकून अलिप्त राहा हा कमळाचा आदर्श भगवद्गीता मांडत आहे. भक्तीने प्रयत्न सुकर होतो. जमिनीवरून किंवा खडकावरून होडी ओढीत न्यायला त्रास पडतो. परंतु पाण्यात असलेली होडी लोटणे कठीण नाही. त्याप्रमाणे आपली जीवननौका भक्तीच्या पाण्यात असेल तर ही नौका सहज पैलपार वल्हवता येईल. पण जीवन जर शुष्क असेल तर हे नौका वल्हवण्याचे काम बिकट होईल.

प्रभू कायम आहे, मी सेवक कायम आहे व ही सृष्टीपण. तो सेवा घेऊन दमतो का, मी सेवा करून दमतो. लागू दे चढाओढ. पाहूच या मौज. त्याने दहा अवतार घेतले तर माझेही दहा. तो राम झाला तर मी हनुमान. तो कृष्ण झाला तर मी उद्धव. सृष्टी ही पूजेची साधने व प्रत्येक क्रिया म्हणजे पुरुषोत्तमाची पूजा. अहंशून्य सेवा म्हणजे भक्ती.

सारे जीवन हरिमय व्हावे, पूजारूप व्हावे हा गीतेला हव्यास आहे. या अध्यायात गीतेचे सर्व सार आहे. गीतेची शिकवण येथे पूर्णपणे प्रकट झाली आहे. ती जीवनात उतरविण्यासाठी सर्वांनी रात्रंदिवस झटावे, असे विनोबाजींचे सांगणे.

अध्याय १६ व १७ हे परिशिष्टाचे अध्याय आहेत असे विनोबाजी म्हणतात. १६ व्यात दैवी आसुरी संपत्तीचा झगडा दाखवलाय. अहिंसा व हिंसेची सेना कौरव-पांडवांप्रमाणे समोरासमोर उभी आहे. अहिंसेत निर्भयता आघाडीला व नम्रता पिछाडीला उभी आहे. निर्भयतेने प्रगती करून घेता येते व नम्रतेने बचाव. आसुरी संपत्तीला तिहेरी महत्त्वाकांक्षा सत्ता - संस्कृती आणि संपत्ती. आसुरी संपत्तीत काम-क्रोध-लोभ हे तीन नरकाचे दरवाजे. बुद्ध म्हणतो, 'संत उंच पर्वतावर चढून शिखरावरून संसाराकडे बघतात. मग संसार त्यांना क्षुद्र दिसतो. तुम्हीही तसेच करा. मग संसारात लक्षच लागणार नाही.'

सतराव्या अध्यायाला 'साधकाचा कार्यक्रम' नाव दिले आहे. गीता या अध्यायात रोजचा कार्यक्रम सुचवीत आहे. (नित्य क्रिया) जीवनात आनंद वाटावा. त्याचा बोजा वाटू नये म्हणून वर्तन बांधून घेतले पाहिजे. सृष्टी-समाज-शरीर या तीन संस्था. या तिन्ही एकरूपच. या संस्थांसाठी जी सेवा करू ती सेवा यज्ञरूपच असणार. ती सेवा निरपेक्ष असली म्हणजे झाले. 'ॐ तत सत्' हे वैदिक नाव घेऊन गीतेने सर्व क्रिया (यज्ञ-दान-तप इ.) परमेश्वरास अर्पण करावयास शिकवले आहे.

विनोबाजी एक प्रश्न येथे उपस्थित करतात, 'ॐ तत् सत्' हे नाव पवित्र पुरुषाला पचावयाचे. पाप्याने काय काय करायचे? त्याच्या मुखात शोभेल असे एखादे नाव आहे का? तर 'ॐ तत् सत्' या नावात तीही शक्ती आहे. पापातून निष्पापतेकडे ते नेऊ शकते.

पुण्यमय, पण अहंकारी जीवन एका बाजूस व दुसऱ्या बाजूस पापमय, पण नम्र जीवन. यातून एक पसंत करा असे कोणी म्हणेल तर मी तोंडाने बोलू शकलो नाही तरी अंत:करणात म्हणेन 'ज्या पापाने परमेश्वराचे स्मरण मला राहील ते पापच मला मिळू दे.' तुकाराम महाराजही हेच

म्हणतात, *'हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा । गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व गोडी । नलगे मुक्ती धन संपदा । संत संग देई सदा । तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ॥'*

आता १८ वा कळसाध्याय. त्याला फलत्यागाची पूर्णता : ईश्वरप्रसाद हे शीर्षक विनोबाजींनी दिले आहे. गीता अभ्यासकांना, वाचकांना 'गीता प्रवचने' वाचताना अध्यायाच्या विषयाची स्पष्ट कल्पना सहजपणे येऊ शकेल अशीच शीर्षके विनोबाजींनी प्रत्येक अध्यायाला दिली आहेत.

विषयाची कल्पना आली की वाचक त्यात सहजपणे अवगाहन करू शकेल. हे विनोबाजींचे उद्दिष्ट यातून दिसून येते.

संन्यास व फलत्याग या दोहोच्या मर्यादा कशा व किती? हा अर्जुनाचा प्रश्न. जसजशी चित्तशुद्धी होत जाईल. तसतशी क्रियेची तीव्रता कमी होईल. तीव्रातून सौम्य, सौम्यातून सूक्ष्म व सूक्ष्मातून शून्य होत जाईल. कर्म निराळे क्रिया निराळी. कर्माची व्याख्या - कर्त्याला जे अत्यंत इष्ट ते कर्म. अशी विनोबाजींनी कर्माची व्याख्या केली आहे. क्रिया सूक्ष्म होत जाते व कर्म वाढत जाते. विचारांच्या या ओघाने क्रिया शून्यत्व प्राप्त होई. परंतु अनंत कर्म आपोआप होईल. सूक्ष्माचे शून्य अशा रीतीने सारे क्रियाजात गळून पडेल. जर आणखी पुढे नेला तर चित्त परिपूर्ण शुद्ध झाले म्हणता येईल. म्हणजे शेवटी क्रिया शून्यरूप होऊन अनंत कर्म होत राहील.

अध्यायाच्या शेवटी भगवंत म्हणतात, 'मी सांगितलेले सर्व नीट ऐकलेस ना? आता विचार करून तुला सुचेल तसे कर म्हणून त्याला स्वातंत्र्य देतात. पण क्षणभरच. लागलीच ते म्हणतात, तू माझा आवडता आहेस म्हणून सांगतो, सर्व धर्म सोडून तू मला एकट्याला शरण ये. मी तुला सर्व पातकांपासून मुक्त करीन. विनोबाजी म्हणतात, असे क्षणभरचे स्वातंत्र्य अर्जुनाला मोठेपणाने दिले. पण पुन्हा त्यांना कळवळा येऊन त्यांनी दिलेले स्वातंत्र्य काढून घेतले. याचा अर्थच हा की 'तुला स्वतंत्र अशी इच्छाच होऊ देऊ नको. स्वत:ची इच्छा नाही चालवायची, त्याची चालवायची. स्वतंत्रपणा नको असेच मला स्वतंत्रपणे वाटू दे. मी नाही सारे तू असे व्हावे. त्यांनी दिलेले बकऱ्याचे उदाहरणही समर्पकच आहे. आता सारं 'तुही तुही तुही'.

इथे गीता संपते व गीताप्रवचनेही. विनोबाजींनी सर्वच विवेचन इतके प्रत्ययकारी व उद्बोधक केले आहे. त्याची झलक मी इथे दाखवली आहे. प्रत्यक्ष पुस्तक वाचायला घेतल्यावर पूर्ण केल्याशिवाय तुम्हाला खाली ठेवावेसेच वाटणार नाही. पुस्तक परिचय करून देताना त्यातले काय सांगू नी किती सांगू असे मला झाले. सोप्या व रसाळ भाषेत अंतरिक तिडिकेनं ही प्रवचने विनोबाजींनी लोकांसमोर ठेवली आहेत. गीतेच्या अभ्यासकांना ती निश्चितच उपयोगी पडतील. तसेच साधकांना मार्गदर्शक ठरतील. मुळातून वाचलेच पाहिजे असे हे छोटेसे, पण उपयुक्त पुस्तक.

आशा भिडे
बी/१, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१४०

दिशा
नियमित
वाचा

ग्रंथप्रसार

# 'मत्स्यपालन' - माहितीपूर्ण पुस्तक

प्रत्येक माणसाला कोणता ना कोणता छंद हवाच. धकाधकीच्या जीवनात तो आवश्यक आहे. मानसिक ताण कमी करण्यासाठी, मनाला शांतता मिळावी यासाठी त्याचा मोठा उपयोग होतो. त्यापासून मिळणारा आनंद अवर्णनीय आहे.

घरामध्ये मत्स्यपेटीत रंगीत मासे पाळण्याचा छंद कित्येक शतकांपासून चालत आलेला आहे. माशांचे विविध आकार, त्यांचे इंद्रधनुषी रंग, मनमोहक हालचाली याचे आकर्षण सर्वांनाच वाटते. तथापि त्यांचे पालनपोषण करून व्यवस्थित संगोपन करणे सहजासहजी जमत नाही. त्याकरिता त्या त्या माशांबाबत शास्त्रीय माहिती. त्यांच्या जीवनपद्धतीचा समग्र इतिहास माहीत असणे आवश्यक आहे. जगामध्ये निरनिराळ्या देशांत मत्स्यपालनाचा छंद मोठ्या प्रमाणात जोपासला जातो. मराठीत या विषयावर फारसे वाङ्मय नसावे ! 'मौलिक मत्स्यव्यवसाय' (गंगाधर महाम्बरे), 'घरचे मत्स्यालय' अशी काही पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

### मत्स्यपालन

'मत्स्यपालन' हे पुस्तक (पृ.१७२, मूल्य रु. १६०/ ) श्री. पुष्कर पद्माकर वर्तक (वर्तक प्रकाशन, ५२१ शनिवार पेठ, पुणे - ४११०३०) यांनी लिहिलेले आहे. त्याची प्रथम आवृत्ती ४ जानेवारी २००३ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. ज्याला मत्स्यपालनाची आवड आहे त्याने काही प्राथमिक गोष्टींची माहिती करून घेणे अत्यावश्यक असते. या प्राथमिक गोष्टींचे पालन केले गेले नाही तर मासे निश्चितपणे मरतात. मासे मेल्याचे आणि खर्च झाल्याचे दुःख आपल्याला होतेच. त्यातच आपण जोपासलेला हा छंद कोमेजून जातो.

माशांसाठी असलेली पेटी कशी असावी? ती कोठे ठेवायची? त्यात असलेले पाणी कसे असावे? माशांसाठी आवश्यक असलेले पाणी कसे असावे? माशांसाठी आवश्यक असलेला प्राणवायू कसा सोडावा? माशांना आवश्यक असणारे तापमान कसे राखावे ? हिटर केव्हा व कसा वापरावा? पाणी स्वच्छ करण्याच्या (फिल्टर) पद्धती कोणत्या ? त्यांची कार्यपद्धती कशी असते? पिल्ले पाळण्याच्या पद्धती, त्यांचा आहार, त्यांना होणाऱ्या रोगांपासून बचाव कसा करावा इन्फुसुरिया (पॅरामेशियन सारख्या अतिसूक्ष्म जीवांना इन्फुसुरिया म्हणतात) घरी तयार करण्याच्या पद्धती कोणत्या? इ. इ. अत्यंत उपयुक्त माहिती या पुस्तकात दिलेली आहे. सुमारे ८० प्रकारचे मासे, त्यांचे शास्त्रीय नाव, त्यांचा आकार, आहार, स्वभाव, त्यांचे प्रजनन इ. इ. माहितीही सविस्तरपणे दिलेली आहे. माशांच्या रंगीत फोटोचित्रांनी या पुस्तकाचे मोल खूप वाढलेले आहे. या सर्व प्रकारच्या माशांचे आयुष्य, त्यांची वैशिष्ट्ये इ. इ. मनोरंजक माहितीही या पुस्तकात आहे.

तारापोरवाला मत्स्यालय (मुंबई) चे माजी क्युरेटर दि. ह. म्हसवडे यांची प्रस्तावना व लेखकाचे वडील सुप्रसिद्ध लेखक डॉ. प.वि. वर्तक यांचे आशीर्वाद या पुस्तकास लाभले आहेत. मत्स्यपालनाचा छंद बाळगणाऱ्यांनी हे पुस्तक संग्रही ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांची ती गीताच आहे. हा छंद वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने व हा छंद जोपासण्याचा आनंद मिळवावयाचा असेल तर या पुस्तकाचे वाचन होणे आवश्यक आहे आणि म्हणूनच लेखक पुष्कर वर्तक यांचे खास अभिनंदन !

- शरद जोशी (ग्रंथप्रसारक)

ग्रंथप्रसार

साहित्य जगत - एक हजार वर्षांचं संचित एकत्रित देणारा महद्ग्रंथ

# 'यांनी घडवलं सहस्रक'

रोहन प्रकाशनाने (१ला मजला, 'आनंदी-श्रीपाद', ३९६ ब, नारायण पेठ, पत्र्या मारुती चौक, पुणे - ४११०३०, दूरध्वनी - ९५२०-४४८०६८६/५४६१२०७) ने एक अपूर्व असा ग्रंथ प्रकाशित केलेला आहे. आपल्या कर्तृत्व व विचारांनी मानवी जीवन प्रभावित करणारी, एक हजार वर्षांचा कालखंड व्यापून टाकणारी, गेल्या हजार वर्षांतील जगभरातली एक हजार उत्तुंग व्यक्तिमत्त्वे (कला, विज्ञान, साहित्य, राजकारण, समाजकारण, क्रीडा, उद्योग, तत्त्वज्ञान व इतर काही क्षेत्रांतील) यांच्याविषयीची नेमकी माहिती एकत्रितपणे या ग्रंथात आहे. ग्रंथाची वैशिष्ट्ये म्हणजे, सर्वोत्कृष्ट निर्मिती मूल्ये, वैशिष्ट्यपूर्ण रेखाचित्रे मासिकाच्या आकाराची ६४८ पाने मूल्य रु. ६९५/-. सवलतीत हा ग्रंथ रु. ५००/- मध्ये मिळणार आहे. त्याची मुदत ३०/११/२००३ पर्यंत आहे. हा ग्रंथ अनेक शहरातील प्रमुख विक्रेत्यांकडे तसेच प्रदर्शनात उपलब्ध असेल किंवा आपण उपरोल्लेखित पत्त्यावरून थेट मागवू शकता. आपण रु. ५५०/- चा (रु. ५००/- अधिक रु. ५०/- पोस्टेज खर्च) डीडी किंवा मनीऑर्डर पाठवावी. मुंबई, पुणे, ठाणे येथील चेकही स्वीकारले जातील. ग्रंथ रजिस्टर्ड पोस्टाने मिळेल. बाहेरगावचे चेक्स असल्यास बटणावळीसह रु. ५७५/- चा चेक पाठवावा.

**ग्रंथाची वैशिष्ट्ये -**

इ. स. १००० ते २००० या विशाल कालखंडात कितीतरी उलथापालथ घडून गेली ! मानवी जीवन घडविणाऱ्या कित्येक व्यक्ती होऊन गेल्या ! काही आज हयात आहेत. कित्येक व्यक्ती विस्मृतीत गेल्या आहेत. आपल्यासाठी काही ज्ञात, काही अल्पपरिचित, काही अज्ञातच ! या व्यक्तित्वांबद्दल काही जाणून घ्यावे म्हटले तर या माहितीयुगातही किती प्रयास करावे लागतात. त्यात मातृभाषेत असं साहित्य त्यामानाने बेताचेच ! आणि म्हणूनच अशा विविध क्षेत्रांतील नामवंतांची नेमकी माहिती या ग्रंथात समाविष्ट केलेली आहे. माहिती रुक्ष स्वरूपात असली की लक्षात राहणंही कठीण. म्हणून ही सर्व माहिती डॉ. जयंत नारळीकर, ग.प्र. प्रधान, चंद्रशेखर धर्माधिकारी, कुमार केतकर, डॉ. यु. म. पठाण, पुष्पा भावे, अशोक जैन, निरंजन घाटे, दत्ता मारूलकर इ. एकूण १६० नामवंतांनी लिहिली आहे. या ग्रंथाचे संपादन डॉ. सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपानेरकर यांनी केलेले आहे. संकल्पना - स्वरूप प्रदीप चंपानेरकर यांचे आहे. संकलन-आनंद अवधानी यांचे असून लेखन संयोजन - युनिक फीचर्स (पुणे) यांचे आहे. प्रस्तावना डॉ. अरुण टिकेकर यांची आहे

हा ग्रंथ म्हणजे अनमोल ठेवा आहे !

सहस्रकाचे संचित असलेला हा ग्रंथ म्हणजे अमोल व्यक्तिठेवा आहे. प्रत्येक शाळा, कॉलेज, वाचनालये, विविध संस्था, वाङ्मयप्रेमी मंडळी यांनी हा ग्रंथराज अवश्य संग्रही ठेवावा. रोहन प्रकाशनाच्या कुटुंबियांचे मन:पूर्वक अभिनंदन !

- शरद जोशी (ग्रंथप्रसारक)

सी-५, अमर कल्पतरू को. हौ.सो;
देवी चौक, शास्त्रीनगर, डोंबिवली (प.),
जि. ठाणे - ४२१२०२

# योगाभ्यास - कशासाठी ? कोणासाठी?

मित्रहो,

योगाभ्यासाची आवश्यकता, महती आज आणि भविष्यात असणारी त्याची अपरिहार्यता हे सर्व पुस्तकात वाचून, भाषणे ऐकून, दूरदर्शनवर पाहून कळतंय, पटतंय पण मन तिकडे वळत नाहीये. आळस, योगासंबंधी अजूनही मनात रेंगाळणाऱ्या गैरसमजूती, गूढता, पूर्वग्रह आपल्याला योगाकडे जाण्यापासून रोखतात. इतर शारीरिक व्यायामाप्रमाणे योगासनांचा परिणाम चटकन दिसून येत नाही हे आणखी एक कारण पुरेशा माहितीअभावी पुढे केले जाते. या सर्वातून आपण बाहेर पडणार आहोत तरी केव्हा? हा आपल्याला आयता मिळालेला वारसा, जी आज आपली संस्कृती आहे व उद्याची गरज आहे, आपण केव्हा ओळखणार !

अभ्यासू, चिकित्सक पाश्चात्यांनी पन्नास वर्षांपूर्वीच योगाचा अभ्यास प्रथम शारीरिक स्तरावर सुरु केला. त्याचा अनुभव आल्यावर मानसिक स्तरावर ते येऊन ठेपले आणि आज अमेरिकेत सुमारे दोन कोटी योगाभ्यासी आहेत तर हजारो ध्यानकेंद्रे त्यांनी तिकडे उभारली आहेत. आपले वेद, उपनिषदे, वैद्यकशास्त्र, आयुर्वेद, संस्कृत भाषा, योग इ. अमूल्य ठेवा पाश्चात्य देशात सुखाने नांदतोय, वाढतोय त्याचा तिकडे चांगला प्रसार होतोय ही त्यांच्या दृष्टीने भाग्याची गोष्ट आहे. पण आपल्याला ती भूषणावह वाटते का ? या सर्व विषयांचा अभ्यास आता आपल्याला जर्मनी, अमेरिकेत जाऊनच करावा लागणार, ही अभिमानाची गोष्ट आपण मात्र त्यांची व्यसने, फास्टफूड, विचित्र नृत्य, कपडे वगैरेंचा स्वीकार करत आहोत ज्यांचा ते देश त्याग करीत आहेत.

आपण मात्र सदैव उपभोगीच बनत आहोत, परिणामी रोगीसुद्धा. पण 'योगी' बनलात तर उपभोग घेण्यात तारतम्य येऊन निरोगी राहू शकाल. आज सुबत्तेमुळे भरपूर खाणं आहे, मनोरंजनाचा अतिरेक आहे, विविध प्रकारच नवीन संगीत आहे पण बरचसं निःस्वत्त असल्याने तृप्ती नाही, शांतता नाही, वाढती वस्ती, निःसत्व खाणं पिणं, पर्यावरणाचा ऱ्हास, वाढती घाण, बेशिस्त यामुळे अगम्य रोगांचा प्रादुर्भाव नित्य होतच राहणार आहे. पण आपलं शरीर आणि मन मात्र आहे तेथे तसेच पुढे राहणार. शिवाय दिवसेंदिवस समोर येणारी आव्हाने वाढतच जाणार. मग ती पेलायला आपलं शरीर आणि मन खंबीर नको का? इथेच 'योगाभ्यास' आपला जिवलग मित्र बनतो.

'योग' शब्दाचा अर्थ आहे-जोडणे, एकत्र आणणे. आपलं शरीर, श्वास, मन अणि बुद्धी एकत्र नांदत असतील तरच आपण करत असलेल्या कामात कुशलता येते म्हणजेच अन्य शारीरिक व्यायामाप्रमाणे 'योग' फक्त शारीरिक स्तरावर परिणाम न करता वरील चारही स्तरांवर एकाचवेळी परिणाम करत असतो, विचारांत सुसूत्रता आणतो. आपलं मन सतत भूतकाळ-भविष्यकाळातच झोके घेत असते त्याला योगाभ्यास अलगद जमिनीवर म्हणजेच 'वर्तमानात' आणतो. नियमित योगाभ्यासाने व्यक्तिमत्वात चांगला बदल घडतो, कारण आत्मविश्वास वाढतो. आपण क्रियाशील बनतो, आळस झडतो, सतत मन पोखरणारे, पाय मागे ओढणारे नकारात्मक विचार नाहीसे होतात. शरीर आणि मन त्यामुळे हलके तणावरहित बनते. योग म्हणजे फक्त आसनं किंवा ध्यान नव्हे, तर आसनं, प्राणायाम, धारणा, ध्यान हे योगाच्या आठ अंगांपैकी चार प्रकार तरी रोज अभ्यासले तरच त्याला एकत्रित परिणाम म्हणजे शरीर निरोगी, सुडौल आणि मन सतत प्रसन्न राहील. योगासंबंधी अधिक माहिती पुढील अंकी.

गोविंद त्रिं. साठे

दूरध्वनीः २५४३ ५२६५

# परिसर वार्ता



## प्रा. मोझेस कोलेट यांना डॉक्टरेट

प्रा. मोझेस कोलेट यांना मुंबई विद्यापीठातर्फे अलीकडेच वनस्पतिशास्त्रातील संशोधनाबद्दल पी.एच्.डी. ही पदवी प्रदान करण्यात आली. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व याच महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक असणारे प्रा. कोलेट यांनी 'स्टडीज् ऑन सेल्युलोज डीग्रेडींग फन्जाय' या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला. यासाठी डोंबिवलीच्या पेंढरकर महाविद्यालयाचे वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. रवींद्र बागूल यांनी मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. यापूर्वी प्रा. कोलेट यांनी एम्. फिल्. ही पदवी सेवेत असतानाच संपादन केली होती.

भारतीय संस्कृतीत फुलांचा विपुल व विविधतापूर्ण वापर सातत्याने होतो. वापरून निर्माल्यवत झालेली फुले जलाशयात विसर्जित केल्यास जलप्रदूषणाची भीती असते. याउलट विशिष्ट प्रकारची बुरशी वापरून या निर्माल्यापासून उत्तम प्रकारचे जैविक खत अत्यंत कमी वेळात निर्माण करण्यासंबंधी हे संशोधन आहे. प्रा. कोलेट यांनी ही विशिष्ट प्रकारची बुरशी प्रथम विकसित करून त्यांचा या कामी वापर केला व शेतकऱ्यांना अशा बुरशीचे वाटप करण्याच्या दृष्टीने सोयीस्कर पद्धती टाकाऊ पदार्थांतून निर्माण केली. फुलांप्रमाणे भुईमुगाची टरफले, उसाचा चोथा, लाकडाचा भुसा, ओला कचरा यांच्यापासून खत बनवण्यासाठीदेखील या संशोधनाचा उपयोग होणार आहे.

विद्यार्थीप्रिय असणारे प्रा. कोलेट महाविद्यालयीन परिसरातील एन्.सी.सी. (आर्मी विंग)चे कमांडर आहेत. फ्लेमिंगो निसर्ग मंडळ, वनस्पतीशास्त्रातील शैक्षणिक सहलींचे संयोजन आदी अभ्यास व अभ्यासेतर कार्यांचा त्यांना विपुल अनुभव आहे.

'ही पदवी मिळाली, यामागे आई-वडिलांचे, गुरुजनांचे आशीर्वाद, पत्नीची व मुलांची साथ आणि मुख्य म्हणजे परमेश्वरी कृपा आहे.' अशा शब्दांत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. कोणतेही काम करण्यासाठी अपार कष्टांची तयारी व एकाग्रता हे त्यांचे स्वभावविशेष आहेत. सदर प्रबंधाचे संगणकीय काम व इतर मांडणी त्यांच्या पत्नी श्रीमती क्लेरा कोलेट यांनी केली आहे.

## पुस्तक प्रदर्शन (ग्रंथालय)

दि. १६ डिसेंबर २००३ रोजी तंत्रनिकेतनाच्या ग्रंथालयात पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्या कार्यक्रमाचा आम्हीही एक भाग असल्या कारणाने आम्हाला त्याचा एक चांगला अनुभव मिळाला. आमच्या सोबतीने इतर १७ स्वयंसेवकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता व हा कार्यक्रम पूर्णत्वास नेण्यास हातभार लावला.

तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्रीयुत एस्.एस्. मुजुमदार, उपप्राचार्य प्रो. डी. के. नायक, इ. पी.एस्. विभागाच्या प्रमुख सी. एन.व्ही. वडेर तसेच सहाय्यक ग्रंथपाल सौ. बी. ए. जोशी यांनी सकाळी १० वाजता दीपप्रज्ज्वलन करून प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

या प्रदर्शनात तंत्रनिकेतनातील मुलांना जास्तीत जास्त उपयुक्त अशा पुस्तकांची ओळख व्हावी असा आमचा हेतू होता. आपल्या ग्रंथालयात भरपूर उपयुक्त अशी पुस्तके आहेत. परंतु अशी पुस्तके मुलांकडून हाताळली जात नाहीत व ही पुस्तके वापरल्याने मुलांचा जास्तीतजास्त फायदा होऊ शकतो, ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे हे या पुस्तक प्रदर्शनाचे प्रमुख उद्दिष्ट होते.



या प्रदर्शनासाठी सहाय्यक ग्रंथपाल सौ. बी. ए. जोशी यांचे बहुमुल्य मार्गदर्शन आम्हाला लाभले. ग्रंथालयातील इतर कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाला मोलाचा हातभार लावला व सर्वांच्या एकत्रित प्रयत्नाने सदर कार्यक्रम दि. १६ डिसेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत उत्साहात पार पडला.

सकाळी दहा वाजल्यापासूनच विद्यार्थ्यांची वर्दळ वाढू लागली होती. ग्रंथालयात एकूण ९०६० पुस्तके आहेत. त्यातली ८५० हून अधिक पुस्तके प्रदर्शनात मांडण्यात आली होती. पुस्तकांची कोर्सनुसार विविध गटांत विभागणी करण्यात आली होती. उदा. केमिकल, इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्ट्रुमेंटेशन, कॉम्प्युटर इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स यांची पुस्तके वेगवेगळ्या विभागात मांडण्यात आली होती. तसेच प्रत्येक कोर्सेसची हॅण्डबुक, एन्सायक्लोपिडीयासुद्धा ठेवण्यात आले होते. तसेच मराठी पुस्तके, मॅनेजमेंटची पुस्तके व डिक्शनरी यांच्यासाठीही वेगळा विभाग करण्यात आला होता.

आपल्या कॉलेजच्या आवारातील इतर कॉलेजमधील अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. जवळजवळ ४७५ विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट दिली. तेथील स्वयंसेवकांनी प्रत्येक पुस्तकाची विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. विद्यार्थ्यांच्या एवढ्या उत्स्फूर्त प्रतिसादाने आमचे उद्दिष्ट साध्य झाले असे वाटते.

## वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे, औद्योगिक सुरक्षितता प्रशिक्षण शिबिर

तंत्रनिकेतनातील स्टाफसाठी 'इंडस्ट्रिअल सेफ्टी' हा एक ट्रेनिंग प्रोग्रॅम दि. २० व २४ डिसेंबर २००३ रोजी आयोजित केला होता. प्रा. महेश हिबरेकरांनी (ई.पी.एस्. विभाग) प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन सौ. पाताडे व सौ. नांगरे (ई.पी.एस्. विभाग) यांनी केले होते.

यासाठी वक्ते श्री. ए.के. गुप्ता व श्री. व्ही.डी. साठे आणि श्री. ए. जे. दिवाडकर, श्री. पी.बी. शिरसाट हे होते. श्री. गुप्ता यांनी फॅक्टरीत व घरी सुरक्षितता कशी असावी, यासाठी सविस्तर विवेचन करून त्यावर उपाययोजना सांगितली. श्री. दिवाडकर यांनी प्रेक्षकांशी संवाद साधत Accident यासंबंधी पूर्ण माहिती दिली. बिल्डिंग कन्स्ट्रक्शन संबंधात अपघात कसे होतात व त्यावर उपाययोजना काय? या संदर्भात त्यांनी सविस्तर माहिती दिली. श्री. साठी यांनी 'अनसेफ कंडिशन'मुळे अपघात कसे होतात, याची माहिती दिली.



डावीकडून प्रा. हिबरेकर, प्राचार्य श्री. मुजुमदार, श्री. ए.के.गुप्ता, श्री. दिवाडकर, श्री. व्ही.डी. साठे, उपप्राचार्य श्री. नायक 'औद्योगिक सुरक्षितता प्रशिक्षण शिबीर'

श्री. पी.बी. चिरसाटे यांनी माणूस कसा वागतो व का? याशिवाय Communication कसे असावे, यासंबंधी माहिती दिली. त्यांनी एक प्रश्नावली देऊन स्फाटली 'कम्युनिकेशन' म्हणजे काय हे नमूद केले.

२४ डिसेंबर २००३ रोजी डॉ. मनजितसिंग (Exclusive First Aid/CPR Trainer) यांनी First Aid संबंधी माहिती दिली. अपघात घडल्यावर काय उपाययोजना करावी, हे त्यांनी प्रात्यक्षिकांसहित दाखविले. त्यामुळे हा कार्यक्रम रंगतदार झाला.

हा कार्यक्रम स्टाफसाठी एक नवीन माहितीचे दालन उघडणारा ठरला.

हा कार्यक्रम ई.पी.एस्. विभागप्रमुख सौ. वडेर यांच्या सहकार्याने यशस्वी झाला. प्राचार्य श्री. मुजुमदार व उपप्राचार्य श्री. नायक यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे संबंधित वक्ते या कार्यक्रमास उपस्थित राहिले व हा कार्यक्रम स्टाफसाठी एक वेगळा अनुभव देणारा ठरला.

### जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या 'युवा-शिल्पला' प्रथम पुरस्कार

देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये व सप्रे महाविद्यालयातर्फे आयोजित सन २००२-२००३ च्या महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेत ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या 'युवा शिल्प' या वार्षिकांकाने प्रथम क्रमांकाचा लेखक राजा राजवाडे पुरस्कार मिळवला आहे.

या स्पर्धेत ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या कोकणातील चार जिल्ह्यांतील महाविद्यालये भाग घेत असतात. सन २००१-२००२ च्या वार्षिकांक स्पर्धेत जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या 'युवा शिल्प' ला द्वितीय पुरस्कार मिळाला होता. सन २००२-२००३ चा प्रथम पुरस्कार प्राप्त अंक हा अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. प्राचार्य स.वा. गोखले यांचा वाचन-एक छंद आणि आनंद ! 'पर्यटन केसरी' पाटील यांची विशेष मुलाखत आणि विद्यार्थी व प्राध्यापकवर्गाने मराठी, इंग्रजी, हिंदी आणि व्यवसाय मार्गदर्शन विभागात लिहिलेल्या ५० लेखांनी हा अंक सजलेला आहे. महाविद्यालयाच्या वर्षभरातील कार्यक्रम उपक्रमांच्या रंगीत व सचित्र बातम्या हे या अंकाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. 'राष्ट्रीय गिरी' वर्षाचे सूत्र पकडून तयार केलेले देखणे मुखपृष्ठ आणि आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्तींच्या वर्षानिमित्त तयार केलेले समर्पक मलपृष्ठ यामुळे अंकाच्या सौंदर्यात चांगलीच भर पडली आहे. विविध विभागांसाठी विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या अप्रतिम व नेत्रसुखद निसर्गचित्रांनी हा अंक सजलेला आहे. प्राचार्य स.वा. गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्य संपादक प्रा. अनिल भावड यांच्यासह प्रा. सुचित्रा नाईक (इंग्रजी विभाग), प्रा. गौरी तिरमारे (मराठी विभाग), प्रा. अनिल ढवळे (हिंदी विभाग) व विद्यार्थी संपादक हर्षदा पाटील या संपादक मंडळाने तरुणांनी, तरुणांसाठी तयार केलेला हा तरुणाईचा 'युवाशिल्प' अंक महाविद्यालयीन जगतात कौतुकाचाच विषय ठरला आहे.

### 'सांगे गीता' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ




'सांगे गीता' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभी डॉ. विजय बेडेकर, डॉ. मो. दि. पराडकर व लेखिका आशा भिडे

सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या 'सद्धर्म' प्रकाशनातर्फे आशा भिडे लिखित 'सांगे गीता' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ अध्यक्ष डॉ. मो. दि. पराडकर यांच्या हस्ते विद्याप्रसारक मंडळाच्या ठाणे येथील महाविद्यालयाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त श्री.उत्तम जोशी विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, डॉ. मो. दि. पराडकर, लेखिका आशा भिडे, संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. वि. चिं. थोरे हे मान्यवर उपस्थित होते.

सौ. मंजिरी गोखले यांनी प्रा. उषा लिमये रचित शारदा स्तवनाने समारंभाची सुरवात केली. त्यानंतर अध्यक्षांच्या हस्ते मंगलदीप प्रज्वलन झाले.

संस्थेचे विश्वस्त श्री. उत्तम जोशी यांनी प्रास्ताविक भाषण केले. नवाथे ट्रस्टने सुरू केलेले हे कार्य यथाशक्ती पुढे नेण्याचा आमचा सदैव प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. मो. दि. पराडकर यांच्या हस्ते 'सांगे गीता' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

'सांगे गीता' मधील गीतेच्या १ल्या अध्यायावरील गीत सौ. मंजिरी गोखले यांनी स्वरबद्ध करून सादर केले. त्यांना पार्श्वसंगीताची साथ ऋषभ गोखले यांनी व तबल्याची साथ सौ. माधुरी वापट यांनी केली. या गीताने कुरुक्षेत्रावरील युद्ध वातावरण निर्मिती उत्कृष्टपणे केली.

सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टची स्थापना झाल्यापासून ट्रस्टने केलेल्या कार्याचा आढावा संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. वि. चिं. थोरे यांनी घेतला. भारत सहकारी बँकेने केलेल्या आर्थिक सहकार्यामुळेच हे पुस्तक अल्प किमतीत उपलब्ध करून देता आले. यावेळी बँकेचे अध्यक्ष श्री. मा. य. गोखले यांना पुष्पगुच्छ देऊन बँकेविषयी आदर व्यक्त करण्यात आला. यानंतर श्री. थोरे यांनी लेखिकेचा परिचय करून दिल्यानंतर अध्यक्ष डॉ. मो. दि. पराडकर यांच्या हस्ते लेखिका आशा भिडे यांचा शाल, श्रीफळ व चांदीचे स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर या पुस्तकाची सुबक छपाई करून देणारे परफेक्ट प्रिंटस्चे मालक श्री. सांगुर्डेकर व संस्थेच्या इतरही मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार संस्थेतर्फे करण्यात आला.

गीतेवर पुस्तक लिहायचे असे ठरवून हे पुस्तक लिहिलेले नाही. तर भगवंताने हे माझ्याकडून करवून घेतले. मी निमित्तमात्र आहे. मनःशांतीसाठी गीता जवळ केली. परीक्षा दिल्या, अभ्यासली. 'जे जे आपणासी ठावे । ते ते दुसऱ्याशी शिकवावे । शहाणे करून सोडावे । सकळजन ॥' या उद्देशाने लोकांच्या आग्रहावरून गीता सांगण्यास सुरवात केली. मग प्रवचनासाठी बोलावणी येऊ लागली. सोप्या, सुलभ विवेचन पद्धतीमुळे श्रोत्यांचा वाढता प्रतिसाद मिळाला. त्यानंतर विद्याप्रसारक मंडळाच्या 'दिशा' मधून माझी गीतेची लेखमाला चालू झाली. त्यालाही वाचकांचा भरभरून उदंड प्रतिसाद मिळाला. आणि भगवंताच्या कृपेमुळे व जनताजनार्दनाच्या प्रतिसादामुळे व पाठिंब्यामुळे गीतेच्या प्रसाराच्या वैश्विक कार्यातला खारीचा वाटा मला उचलता आला. 'सांगे गीता' आज आपल्या हाती सोपविताना अतिशय आनंद होत आहे. भगवंताने गीतेचे हे कार्य असेच माझ्याकडून करवून घ्यावे, अशी ईश्वरचरणी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला संस्थेचे विश्वस्त, 'सद्धर्म' त्रैमासिकाचे सभासद, लोकसत्तेच्या 'ठाणे वार्ता' चे समन्वयक श्री. सुधीर जोगळेकर, महिलावर्ग, लेखक व साहित्यिक व अनेक गीताप्रेमी बहुसंख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

- संकलित

# सेवानिवृत्ती



## प्राचार्य पाटील

महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची श्री. चंद्रकांत गं. पाटील यांनी ७ वर्षे धुरा सांभाळली. महाविद्यालयाला B++ मूल्यांकन हे त्यांच्या कारकीर्दीचे वैशिष्ट्य ! तसेच शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल २००२ चा जनकवी पी. सावळराम पुरस्कार हा सन्मान, त्यांचा पर्यायाने महाविद्यालयाचाही ! १९७२ पासून प्राध्यापक म्हणन सेवेत रुजू झालेले पाटील सर पदार्थ विज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून ३१ वर्षे काम पाहत होते. महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाचे काम ते अनेक वर्षे पाहत होते. प्राध्यापकांनी आदर्श म्हणून पहावे असे राहणीमान, सुंदर हस्ताक्षर, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी अतिशय जिव्हाळ्याचे संबंध या सर्व कारणांमुळे प्रा. पाटील यांची कारकीर्द महाविद्यालयाच्या प्रगतीला पोषकच ठरली.

प्रा. पाटील १ ऑक्टोबर २००३ पासून निवृत्त झाले. प्रसंगी सहकाऱ्यांना पूर्ण स्वातंत्र्य देवून बारीकसारीक कामाचीही प्रशंसा करून, प्रोत्साहन देणाऱ्या पाटील सरांची उणीव भासत राहणार हे नक्कीच !



## डॉ. प्रा. सेठी

डॉ. प्रा हंसराज सेठी यांनी फिजिकल केमिस्ट्रीत M.Sc. केल्यानंतर दिल्लीच्या सागर युनिव्हर्सिटीतून १९७६ मध्ये डॉक्टरेट संपादन केली. १९७८ मध्ये वा. ना. वांदोडकर महाविद्यालयात रुजू होण्यापूर्वी प्रा. सेठी खालसा कॉलेजमध्ये शिकवत होते. मुळातच हिंदी भाषिक असल्यामुळे त्यांच्या बोलण्यात भाषेचा गोडवा जो होता, तो सर्वांना आपलेसे करणारा होता. तसेच त्यांचा स्वभाव मृदू व मनमिळावू होता. त्यांनी महाविद्यालयात निवडणूक अधिकारी व अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. १९९१ मध्ये प्रपाठक (रिडर) म्हणून नेमणूक झालेले प्रा. सेठी १ नोव्हेंबर २००३ पासून निवृत्त झाले.



## प्रा. उषा तांबे

इंग्रजी विषयात नागपूर विद्यापीठाच्या सुवर्ण पदकाच्या मानकरी असलेल्या प्रा. तांबे १९८४ पासून आपल्या महाविद्यालयात असल्या तरी तत्पूर्वी मुंबईतील लाला लजपतराय सिडनहॅम वगैरे महाविद्यालयातून त्यांनी अध्यापन केले होते.

इंग्रजी विषयातील M.A. तसेच M.Phil असूनही त्यांनी मराठी भाषेचा व्यासंग जोपासला आहे. या दोन्ही भाषेतील ज्ञानामुळे फाऊंडेशन कोर्स सारख्या विषयाला महाविद्यालयात विद्यार्थी त्यांच्या तासाला तल्लीन न झाला तर नवलच ! त्या विविध वर्तमानपत्रातून स्तंभलेखन, पुस्तकपरिक्षणे, भाषांतरे अशा लेखनातून भरीव कामगिरी करीत आहेत. साहित्यसंघ, ग्रंथाली, कथा अशा अनेक उपक्रमांच्या त्या मानद सदस्या आहेत. प्रा. तांबे यांनी महाविद्यालयातील सांस्कृतिक मंडळ, संयुजा मासिक वगैरे विविध समित्यांचे काम पाहिले आहे. या शैक्षणिक वर्षापासून त्यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली आहे.

'मंडेलाच्या देशात', 'क्रॉंक्रीटचे किमयागार' ही त्यांची अभ्यासपूर्ण वाचनीय पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

महाविद्यालयाच्या मूल्यांकनाकरिता SSR बनवण्यात त्यांचा मोठी सक्रीय सहभाग होता.

सर्व निवृत्त प्राध्यापकांना निवृत्ती नंतरचे जीवन आनंदी व निरोगी लाभो, ही सदिच्छा संयुजा मासिकाच्या माध्यमातून आपण सर्व करु या.

# खरंच सांगतो, ती वाचन-उत्सुक गोड मुलं आहेत !

माझ्या प्रिय पालकांनो,
शिक्षक सहकाऱ्यांनो,
आणि पुस्तकवेड्या ग्रंथपालांनो,
आता शिकवा मुलांना महत्त्व पुस्तकांच,
पुस्तकांच्या वाचनाचं.
जे जीवनाला आकार देतं
आणि बहुश्रुत करतं,
विचार करायला शिकवतं तेच खरं वाचन हे
ध्यानात आणून द्या त्यांच्या.
नुसतं पोथीनिष्ठ करू नका मुलांना
आणि करूनही घेऊ नका केवळ पोपटपंची !
होऊ द्या जाणीव त्यांना 'गावगाड्याची'
आणि 'गावगाड्याबाहेरच्या' आयुष्याची.
वेडी कांबळेचं जिणं त्यांना समजायला हवं,
तसंच 'उपरा' असणं म्हणजे काय असतं
ते ही कळायला हवं.
'बलुतं' दारीची वणवण बोचली पाहिजे त्यांच्या
खोल आतवर 'आठवणीतल्या पक्ष्यांसारखी'
आणि माणसं कळायला हवीत रस्त्यारस्त्यावरची.
'कोसबाडच्या टेकड्या' त्यांना चढायला शिकवा.
आणि शिकवा त्यांना की आदिवासी समजून
घेताना दमायला होत नसतं तर
त्यातून 'जेव्हा माणूस जागा होतो'
तेव्हा या जागा झालेल्या माणूसपणामुळेच
'माता नर्मदा' ही समजते आणि समजतं
'भारतीय स्त्रीजीवन' व दिसू लागतात
'स्त्री-संघर्षाची नवी रुपे'.
या नव्या रुपातच त्यांना जेव्हा भेटेल एखाद्या
'अरुणाची गोष्ट.'
तेव्हा 'इच्छा नसताना' ही कसं जगायचं ते
आपसूक मनात उतरेल त्यांच्या.
उतरलं जाईल 'निरामय कामजीवन'
तेव्हा 'एड्सचे दुष्परिणाम' सांगायची
वेळच येणार नाही आपल्यावर.
'वैद्यकसत्तेतला' क्लोरोफॉर्म' त्यांना गुंगी आणेल
अथवा 'कॅन्सरची कहाणी' वाचून
'लाखमोलाचा जीव' कसा वाचवावा
म्हणून ते भयभीत होतील. पण त्यांना द्या समजावून की
संगीता वझेसारखी तरुणी
ही 'कॅन्सरची यात्रा' करून 'कॅन्सरची झुंज'
देऊन आली आहे.
'उंच माणसांच्या वेटांवरचे' हे केवळ अपघात
असतात.
हे ही सांगा त्यांना पुस्तकं दाखवून.
नेहमीच त्यांनी आपल्या 'अवतीभोवती'
बघायला शिकलं पाहिजे असं वाटत असेल तर,
'जगावेगळं जग' पाहायला शिकवा त्यांना
'इदं न मम' या मंत्रघोष आत्मसात करायला सांगा.
'हमाल पंचायत' ते जेव्हा वाचतील तेव्हाच
ते टाकून देतील पाठीवरचा लाजेचा बोजा दूरवर
आणि उतरतील 'नरक सफाईच्या कार्यात.
त्यांना स्वच्छ सांगा की प्रत्येकाने
'कार्यरत', व्हायलाच पाहिजे असं नसतं.
'संकल्प' वाचूनही येतं भान चळवळीचं.
फक्त त्यासाठी 'विमुक्तायन' ही
वाचायला लागतं.
'तराळ अंतराळात' शिरून तळमळीनं.
या तळमळीतून ते 'कोणाची आग चोरायला'
लावण्याचं पातक करणार नाहीत.

'मजल दरमजल' करीत त्यांच्या जीवनाचा प्रवास
होईल केवळ फक्त त्यांचाच, वाचन
नावाचा 'माझा प्रवास'
तेव्हा त्या प्रवासातच त्यांना कधी भेटेल 'तोतोचान'
तर कधी 'पश्चिमेचा पुत्र'
तर कधी 'सिसिफस'ची जीवघेणी धडपड.
'सारे प्रवासी घडीचे' हे ही त्यांना कळेल त्यातूनच.
आणि जेव्हा ते तुडवतील, 'कथांच्या पाऊलवाटा'
तेव्हा त्यांना 'पाडस' मधल्या मुलाचा
कलासक्तपणा ही शिकवायला हवा.
तसं त्यांनी स्वीकारायला हवं 'जंगलाचं देणं.'
'कोवळी उन्हे' जशी त्यांच्या अंगावर पडायला हवीत,
तसं 'व्यक्ती आणि वल्ली' वाचून खळखळून
हसायला हवं त्यांनी.
यदुर्नींचा 'महाराष्ट्र' वाचून
खरा इतिहास स्फुरण पावून वाहायला हवा
तसं 'मनशतक शोधता शोधता'
'समाज स्पंदने' ही कळायला हवीत
त्यांना एकोणिसाव्या शतकातली.
फुले, आंबेडकर वाचून त्यांच्या आयुष्याचं चरित्र
निर्माण करायला असं ते शिकतील,
तसंच ते शिकतील 'वडीलधाऱ्या' माणसांचा
आदर करायला.
माझ्या प्रिय पालकांनो,
शिक्षकांनो आणि ग्रंथपालांनो,
द्या त्यांना नजर विशालाच्या दृष्टीची
तेव्हाच त्यांचं नातं जडेल आकाशाशी
आणि मातीशी ही.
अपयशातून होतात अंधश्रद्धेचे बळी
म्हणून कडक नजर ठेवा त्यांच्या वाचनावर
त्यांना आवर्जून सांगा -
कथा-कादंबऱ्या नसतात केवळ मनोरंजनासाठी.
तर त्या असतात.
जीवनातले संघर्ष समजून घेण्यासाठी.
माणसामाणसांतले संबंध उकलून दाखविण्यासाठी.
अशा कथा-कादंबऱ्या ते जेव्हा वाचतील
तेव्हा ते बाहेर पडतील आपल्या 'कोसला'तून
त्यांच्या मनातला 'पारवा' गाऊ लागेल,
तेव्हा त्यांचा 'प्रवासी पक्षी'
स्वतःच्या आयुष्याची 'सनद' जाहीर करेल
'नक्षत्रांचे देणं' दिल्यासारखी
त्यांच्या मनातला 'भटका पक्षी' बसू दे
पुस्तकांच्या ओळी-ओळींवर.
मग तेच 'अक्षर संगती'त गात राहतील
आयुष्यभर.
'परि तैसे हे नोहेचि देवा
देखिला अक्षरांचा मेळावा
आणि विस्मयाचिया जीवा
विस्मयो जाला!'
पुस्तकं हे सर्व शिकवतील त्यांना
पण त्याआधी पुस्तकं न्या तुम्ही त्यांच्यापर्यंत
किंवा त्यांना पुस्तकांपर्यंत.
खरंच, शिकवा त्यांना पुस्तकांचं महत्त्व
खरंच सांगतो सर, ती फारच
वाचन-उत्सुक गोड मुलं आहेत.

प्रा. प्रदीप कर्णिक
ग्रंथपाल, रुपारेल महाविद्यालय